# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक- २४३

**(सभावृत्तांत)**

**दिनांक- ०६/१०/२०२१** **वेळ – दु.२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार, दिनांक **०६/१०/२०२१** रोजी **दु.०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील मा.सभापती, स्थायी समिती यांचे दालनातून मा.सभापती, स्थायी समिती हे मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० व २८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) सभा संचलित केली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा.सदस्य ऑनलाईन व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे उपस्थित होते.

१. **मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे - सभापती**
२. मा.कदम शशिकांत गणपत
३. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
४. मा.संतोष बबन कांबळे
५. मा.अभिषेक गोविंद बारणे
६. मा.बुर्डे सुवर्णा विकास
७. मा.फुगे भिमाबाई पोपट
८. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
९. मा.सुलक्षणा राजू धर
१०. मा.सुजाता सुनिल पालांडे
११. मा.भोईर सुरेश शिवाजी
१२. मा.यादव मीनल विशाल
१३. मा.बनसोडे राजू विश्वनाथ
१४. मा.पाडाळे निता विलास

याशिवाय मा.राजेश पाटील- आयुक्त, मा.ढाकणे- अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप- नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त(३), मा.भोसले मुख्यलेखा परिक्षक, मा.राजन पाटिल- शहर अभियंता, मा.कोळंबे- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.डॉ.रॉय- आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.नाळे- उपसंचालक नगररचना, मा.इंगळे, मा.लोणकर, मा.खोत, मा.चारठणकर, मा.इंदलकर- उप आयुक्त, मा.पोमण- मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.सवणे, मा.भालकर- सह शहर अभियंता, मा.बहुरे, मा.देशमुख, मा.थोरात, मा.आढारी, मा.गायकवाड- सहाय्यक आयुक्त, मा.डॉ.वाबळे- अधिष्ठता वाय.सी.एम.एच., मा.पाटील, मा.पवार, मा.देसले, मा.ओंबासे, मा.काळे, मा.वाघुंडे, मा.टकले, मा.महाजन, मा.देशमुख, मा.धुमाळ,मा.शिनकर- कार्यकारी अभियंता, मा.खडतरे- उपअभियंता, मा.डॉ.साळवे- अति.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.पानसरे- क्रीडा अधिकारी, मा.गोफणे- सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.पानसरे- प्रभाग अधिकारी, मा.जरांडे- सुरक्षा अधिकारी, मा.पाटील- प्राचार्य(आय.टी.आय.मोरवाडी) हे अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

विषय क्र.४१) घंटागाडी कामगारांना दिवाळी सणा करीता विशेष बाब/ बक्षिस र.रु.४०,०००/- देणेबाबत.- मा.भोईर सुरेश व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४२) पिंपरी चिंचवड शहरातील प्रदुषण कमी करणेसाठी व शहरांतर्गत अरुंद रस्त्यावरील बस सेवेसाठी ७ मीटर व ९ मीटर लांबीच्या बस खरेदीसाठी महानगरपालिकेमार्फत निविदा प्रक्रीया राबविणेबाबत.- मा.कदम शशिकांत व मा.कांबळे अंबरनाथ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४३) श्री.मिलिंद नारायण सोमण यांची अंध बुद्धीबळ ऑलिंम्पियाड स्पर्धा, ग्रीस येथे निवड झाल्याने त्यास स्पर्धेसाठी जाण्यास नियमानुसार आर्थिक सहाय्य मंजूर करणेबाबत. - मा.भोईर सुरेश व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४४) गॅबिनवॉल (सुरक्षा भिंत) बांधून मिळणेबाबत.- मा.बनसोडे राजू व मा.भोईर सुरेश यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४५) वर्धापन दिनाचे दिवशी कै.अण्णासाहेब मगर यांची जीवन चरित्र प्रसिद्ध करणेबाबत.- मा.कांबळे अंबरनाथ व मा.भोईर सुरेश यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४६) प्रभाग क्र.२० मधील संत तुकाराम व्यायाम शाळा ही हनुमान स्पोर्ट्स अँकडमी हनुमान जिम या व्यायामशाळेची मुदत वाढवून देणेबाबत.- मा.सुजाता पालांडे व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४७) प्रभाग क्र.२५ व २६ प्रभागातील विशेष योजना कामाचे शिर्षक बदलणेबाबत.- मा.कदम शशिकांत व मा.कांबळे अंबरनाथ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४८) पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकातील फ क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाच्या कामांच्या तरतुदींमध्ये अंतर्गत वर्गीकरण करुन वाढ करणेबाबत.- मा.भोईर सुरेश व मा.कदम शशिकांत यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४९) पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकातील फ क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाच्या कामांच्या तरतुदींमध्ये अंतर्गत वर्गीकरण करुन वाढ करणेबाबत.- मा.भोईर सुरेश व मा.कदम शशिकांत यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५०) पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकातील फ क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाच्या कामांच्या तरतुदींमध्ये अंतर्गत वर्गीकरण करुन वाढ करणेबाबत.- मा.भोईर सुरेश व मा.कदम शशिकांत यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५१) पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकातील फ क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाच्या कामांच्या तरतुदींमध्ये अंतर्गत वर्गीकरण करुन वाढ करणेबाबत.- मा.भोईर सुरेश व मा.कदम शशिकांत यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५२) पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकातील फ क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाच्या कामांच्या तरतुदींमध्ये अंतर्गत वर्गीकरण करुन वाढ करणेबाबत.- मा.भोईर सुरेश व मा.कदम शशिकांत यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५३) फ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्र.क्र.१२ रुपीनगर मेन रोड येथील रस्ता रुंदीकरण कामास अडथळा ठरणारे उपस्कर वाहिन्या व पोल हलविणे या कामास तरतूद वर्गीकरण करणेबाबत.- मा.पौर्णिमा सोनवणे व मा.बनसोडे राजू यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५४) पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकातील झोनिपु स्थापत्य विभागाच्या विकास कामांच्या तरतुदींमध्ये अंतर्गत वर्गीकरण करुन वाढ करणेबाबत.- मा.भोईर सुरेश व मा.कदम शशिकांत यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५५) सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकातील कामांच्या तरतुदींमध्ये वाढ/ घट करणेबाबत.- मा.भोईर सुरेश व मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव.

-------------

मा.स्थायी समिती सभा कार्यपत्रिका क्र.२४२ दि.२९/०९/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-------------

ठराव क्रमांक- १०३८२ विषय क्रमांक- ०१

दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- भूमि आणि जिंदगी

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.भूजि/३/कावि/३५/२०२१, दि.०६/०९/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ग क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्र.क्र.२३ थेरगाव येथील पडवळ नगर दगडू पाटील नगर येथील लोकवस्तीमधील बीफ मांस विक्रीची दुकाने बंद करणे बाबत त्याभागातील नागरीकांच्या मनपाकडे वांरवार तक्रारी प्राप्त होत असल्याने सदर दुकाने पिंपरी येथील इंदिरागांधी उड्डाण पुला खालील बीफ मार्केट मध्ये रिक्त असलेल्या गाळ्यांमध्ये स्थलांतरीत करणेकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ग क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्र.क्र.२३ थेरगाव येथील पडवळ नगर दगडू पाटील नगर येथील लोकवस्तीमधील बीफ मांस विक्रीची दुकाने बंद करणे बाब त्याभागातील नागरीकांच्या मनपाकडे वांरवार तक्रारी प्राप्त होत होत्या. त्या अनुषंगाने दि.२४/८/२०२१ रोजी मा. अति. आयुक्त १ याचे दालानामध्ये सदर ठिकाणीची बीफ मांस विक्रीची दुकाने स्थलांतरीत करणे बाबत बैठक आयोजित करणेत आली होती. सदर बैठकी मध्ये सदर भागामध्ये धार्मिक तेढ वाढून

कायदेशीर अडचनी निर्माण होऊ नये म्हणून त्या भागातील स्थानिक लोकप्रतिनिधी आणि पोलीस अधिकारी यांच्या मध्यस्थितीने संबंधित दुकानादार आणि स्थानिक नागरीक यांच्या सुंक्तरित्या बैठक आयोजित करून सामोपचाराने सदर बीफ मांस विक्रीची दुकाने स्थलांतरीत करणे बाबत सूचना दिल्या होत्या. त्यानुसार दि.०१/०९/२०२१ रोजी ग क्षेत्रिय कार्यालयात सदर बैठक आयोजित करणेत आली होती सदर बैठकी मध्ये प्र.क्र.२३ थेरगाव येथील पडवळ नगर दगडू पाटील नगर येथील बीफ मांस विक्रीची दुकाने पिंपरी येथील इंदिरागांधी उड्डाण पुला खालील असलेल्या बीफ मार्केट मधील रिक्त असलेल्या गाळ्यांमध्ये इतर गाळेधारकांना ज्या दराने भाडे वसुल केले जाते त्या दराने भाडे आकारुन स्थलांतरीत करणे बाबत सर्वानुमते एकमत झाले असल्याने सदर बीफ मांस विक्री करणा-यांना खालील तक्त्यात नमुद केलेल्या गाळ्यांमध्ये स्थलांतरीत करणेत येणार आहे.

| अ.क्र. | गाळा क्र. | क्षेत्रफळ चौ.फुट | स्थलांतरीत गाळे धारकाचें नाव | मासिक भाडे र.रू. | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | १० | १४५ | अब्दुल नबी सॉले महमद चौधरी | ७००/- | |
| २ | ४५ | १४५ | वाहिद मजिद कुरेशी | ७००/- | |
| ३ | ४६ | १४५ | अब्दुल हमीद कुरेशी | ७००/- | |
| ४ | ४७ | १४५ | फय्युम उस्मान कुरेशी | ७००/- | |
| ५ | ४९ | १४५ | जमील अजीज कुरेशी | ७००/- | |
| ६ | ५० | १४५ | युसुफ अहमद कुरेशी | ७००/- | |

वरील तक्त्यातील थेरगाव येथील पडवळ नगर दगडू पाटील नगर येथील लोकवस्तीमधील बीफ मांस विक्री करणा-या दुकानदारांना पिंपरी येथील इंदिरा गांधी उड्डाण पुला खालील बीफ मार्केट मध्ये रिक्त असलेल्या गाळ्यामध्ये र.रू.७००/- इतके मनपा व शासन करा व्यतिरीक्त मासिक भाडे आकारून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७९(अ) नुसार तातडीची गरज लक्षात घेता गाळ्यांचा ताबा देणेकामी मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३८३ — विषय क्रमांक- ०२

दिनांक- ०६/१०/२०२१ — विभाग- क्रीडा

सुचक- मा.कांबळे अंबरनाथ — अनुमोदक- मा.बारणे अभिषेक

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/९/कावि/४६१/२०२१, दि.२०/०९/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा विभागांतर्गत विविध ठिकाणी असलेल्या व्यायामशाळेमध्ये मा.नगरसदस्य यांच्या मागणीनुसार, इनडोअर जिम साहित्य बसविणे आवश्यक असल्याने क्रीडा विभागाच्या सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकीय तरतूदीनुसार “क्रीडा विभागांतर्गत नाविन्यपूर्ण सुविधा उपक्रम राबविणे”मधून र.रू.४ कोटी व “क्रीडा कूल” मधून र.रु.१ कोटी असे एकूण

र.रु.५,००,००,०००/- (अक्षरी र.रु.पाच कोटी फक्त) इतकी तरतूद “क्रीडा व्यायाम साहित्य खरेदी ” या लेखाशिर्षावर वर्ग करणे आवश्यक असल्याने प्रस्तावात नमुद केले प्रमाणे त्यास मान्यता देण्यात येत आहे. (वाढ/ घट र.रु.५००,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३८४ विषय क्रमांक- ०३

दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- ग क्षेत्रिय

सुचक- मा.सुजाता पालांडे अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.सारीका सस्ते व मा.मनिषा पवार यांचा प्रस्ताव.

मा.शिक्षण समिती सभा ठराव क्र.५७ दि.१६/०९/२०२१ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व माध्यमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. त्याच अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व माध्यमिक शाळेतील विद्यार्थीचे हस्ताक्षर सुंदर होणेकरिता “मे.स्पार्कल क्लासेस” यांच्यामार्फत सुंदर माझे अक्षर हे पुस्तक खरेदी करणेबाबत प्रस्ताव कार्यालयास सादर केलेला आहे. सदरच्या एका पुस्तकाची किमत र.रु.९८/- आहे. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व माध्यमिक शाळेतील इ.५ वी ते इ.१० वी तील एकूण ८२१५ विद्यार्थांना सुंदर हस्ताक्षर करिता “मे.स्पार्कल क्लासेस” यांच्यामार्फत सुंदर माझे अक्षर हे पुस्तक थेट पद्धतीने खरेदी करण्यात यावे. सदरच्या उपक्रमास र.रु.८,०५,०७०/-(अक्षरी र.रु.आठ लाख पाच हजार सत्तर फक्त) खर्च अपेक्षित आहे. त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्याची मा.शिक्षण समिती सभेची मागणी असली तरी प्रस्तुत विषय प्रशासनाने तपासून नियमाधीन प्रस्ताव सादर करणेस मान्याता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३८५ विषय क्रमांक- ०४

दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- क क्षेत्रिय, जसनि:सारण

सुचक- मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा.बारणे अभिषेक

संदर्भ- मा.अति. आयुक्त(१) यांचे पत्र क्र.कक्षेका/जनि/६०५/२०२१, दि.१६/०९/२०२१.

मा.अति. आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ‘क’ प्रभागातील जलनि:सारण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पध्दतीने साफसफाई करणे व चोकअप काढणेचे काम ठेकेदार मे.आर्यन पंप्स ॲन्ड एन्व्हायरो सोल्युशन प्रा. लि. हे करीत आहेत. सदर कामाचे निविदा अटी शर्ती (A) मधील अट क्र.४ नुसार सदर

निविदेचा कालावधी ५ वर्षांचा असुन सुरुवातीस कामाचा आदेश १ वर्षासाठी द्यावयाचा आहे. त्यानंतर कामाची प्रगती, Performance विचारात घेवून पुढील प्रत्येक वर्षासाठी मा. स्थायी समितीच्या मान्यतेचे मुदत वाढ देणेत येईल याप्रमाणे अटी व शर्तीमध्ये नमुद करणेत आलेले आहे. मनपाच्या ‘क’ प्रभागातील कामाची ५ वर्ष कालावधीची मुदत दि.३०/०६/२०२१ रोजी संपलेली आहे. तसेच सदर कामास दि.३०/०९/२०२१ पर्यंत प्रथम मुदत वाढ देणेत आलेली आहे. सदरचे काम नागरीकांच्या आरोग्याशी निगडीत असल्याने अखंडीत सुरु ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर कामांकरीता नविन निविदा कार्यवाही पुर्ण होऊन नविन काम सुरु होई पर्यंत सदरचे काम सुरु ठेवणे आवश्यक आहे. परंतु मागील वर्षापासून उद्भवलेल्या कोरोनाच्या(Covid-19) जागतिक संकटामुळे सदर कामांच्या निविदा कार्यवाहीचे काम अपेक्षीत वेळेत पुर्ण होऊ शकले नाही. तथापि, अद्याप पर्यंत ‘क’ प्रभागातील जलनि:सारण नलिका व चेंबर्सची साफसफाई करणे व चोकअप काढणेचे नविन कामाची निविदा कार्यवाही सुरु आहे. सद्यस्थितीत सदर कामांची नविन निविदा कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे सदर कामांची निविदा कार्यवाही होऊन नव्याने कामाचा आदेश देणे करीता आणखी कालावधी लागणार आहे, तसेच सदरचे काम अत्यावश्यक सेवेचे असल्याने मनपा मार्फत अखंडीत सुरु ठेवणे गरजेचे आहे. तरी सदर कामास सन २०२०-२०२१ च्या जुन्या दराप्रमाणेच तीन महिन्यांसाठी मुदतवाढ घेणे आवश्यक आहे. त्या कामांची माहिती प्रस्तावात नमुद केलेली आहे. ‘क’ क्षेत्रीय कार्यालयातील कामास मागील वर्षातील निविदा दरात वाढ न करता प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे र.रू.३३,७७,८२४/-(अक्षरी र.रु.तेतीस लाख सत्याहत्तर हजार आठशे चोविस फक्त) पर्यंत काम करून घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३८६ विषय क्रमांक- ०५
दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- जसनि:सारण
सुचक- मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा.बारणे अभिषेक
संदर्भ- मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/८४२/२०२१, दि.२०/०९/२०२१.
विषय- चिंचवड मैलाशुद्धीकरण केंद्राअंतर्गत प्रभाग क्र.१५ मधील से.क्र.२५ ते २६ व इतर परिसरात जलनि सारण विषयक सुधारणा करणे व उर्वरित ठिकाणी जलनि सारण नलिका टाकणे.

विषय क्र.५चा विचार पुढील सभेचेवेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३८७ विषय क्रमांक- ०६
दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- क्रीडा
सुचक- मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा.बारणे अभिषेक
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/३११/२०२१, दि.३१/०८/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतीक समिती सभा ठराव क्र.४२ दि.१७/०९/२०२१. अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची प्रभाग क्र.२० संत तुकारामनगर येथील राजमाता जिजाऊ सांस्कृतीक भवन

पुरूष व्यायामशाळा संत तुकारामनगर ही जयभारत मित्र मंडळ संत तुकारामनगर या संस्थेस मा.स्थायी समिती सभा सदस्य ठराव क्र.६९७७ दि.११/०३/२०२० अन्वये मा.अतिरिक्त आयुक्त(३) यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/३/कावि/१८४/२०२० दि.२९/१०/२०२० अन्वये दि.०७/०८/२०२० ते दिनांक ०६/०६/२०२१ या कालावधी करिता ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देण्यात आली होती. सदर व्यायामशाळेची करारानाम्याची मुदत दि.०६/०६/२०२१ रोजी संपली आहे. जय भारत मित्र मंडळ संत तुकारामनगर यांची दि.०९/०७/२०२१ ची मागणी व संबंधीत क्रीडा पर्यवेक्षक ह क्षेत्रीय कार्यालय यांच्या कडील दि.११/०८/२०२१ च्या अहवालानुसार व मनपाचे क्रीडा धोरणानुसार प्रभाग क्र.२० संत तुकारामनगर येथील राजमाता जिजाऊ सांस्कृतीक भवन पुरूष व्यायामशाळा संत तुकारामनगर ही जय भारत मित्र मंडळ संत तुकारामनगर या संस्थेस आदेशाच्या तारखेपासून दरमहा र.रु.२०००/-(अक्षरी र.रु. दोन हजार फक्त) म.न.पा कडून देवून ११ महिने कराराने व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास मुदतवाढ देणेकामी मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३८८ विषय क्रमांक- ०७

दिनांक- ०६/१०/२०२१

सुचक- मा.सुजाता पालांडे अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.सारीका सस्ते व मा.आश्विनी वाघमारे यांचा प्रस्ताव.

मा.शिक्षण समिती सभा ठराव क्र.५३ दि.०९/०८/२०२१ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. त्याच अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील विद्यार्थीचे हस्ताक्षर सुंदर होणेकरिता “मे.स्पार्कल क्लासेस” यांच्यामार्फत सुंदर माझे अक्षर हे पुस्तक खरेदी करणेबाबत प्रस्ताव कार्यालयास सादर केलेला आहे. सदरच्या एका पुस्तकाची किंमत र.रु.९८/- आहे. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील इ.३ री ते इ.७ वी तील विद्यार्थांना सुंदर हस्ताक्षर करिता “मे.स्पार्कल क्लासेस” यांच्यामार्फत सुंदर माझे अक्षर हे पुस्तक थेट पद्धतीने खरेदी करण्यास व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्याची मा.शिक्षण समिती सभेची मागणी असली तरी प्रस्तुत विषय प्रशासनाने तपासून नियमाधीन प्रस्ताव सादर करणेस मान्याता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३८९ विषय क्रमांक- ०८

दिनांक- ०६/१०/२०२१

सुचक- मा.सुरेश भोईर अनुमोदक- मा.कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा.सारीका सस्ते व मा.मनिषा पवार यांचा प्रस्ताव.

मा.शिक्षण समिती सभा ठराव क्र.५४ दि.०९/०८/२०२१ अन्वये कोरोना प्रादुर्भावामुळे (विद्यार्थ्यांचे) दोन वर्ष परीक्षा झाल्या नसून दोन इयत्ता एकत्र करून 45 दिवसांचा अभ्यासक्रम एकत्र दिला आहे. त्या अभ्यासक्रमावर आधारित १५ दिवसांनी १ याप्रमाणे ३ पेपर सोडवायचे असतात. त्याचा रिपोर्ट शिक्षण विभागाला(खात्याला) सादर करणे गरजेचे आहे. सदर अभ्यासक्रमाची पुस्तके ऑनलाइन उपलबध आहेत परंतु विद्यार्थांकडे सोयी सुविधा नसल्याने त्यामुळे विद्यार्थांना अभ्यास करणे अवघड जात आहे. विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना अथवा शिक्षकांना त्या पुस्तकांची झेरॉक्स काढावी लागत आह दरचा पाल व विद्यार्थी खर्चकाना करणे शक्य नसल्याने अडचणीचे जात आहे व ते त्यांना सोयीचे होत नाही. त्यामुळे सदरचा खर्च प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभाग मनपातर्फे करण्यात यावा. विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना अथवा शिक्षकांना सदरची पुस्तके हाताळणे सोपे जावे व कमी खर्चात उपलब्ध व्हावे म्हणून हा उपक्रम महानगरपालिका शिक्षण विभागाने राबवून विद्यार्थ्यांना सदर पुस्तके उपलब्ध करून त्वरित देण्यात यावी. सदर प्रक्रिया वेळेमध्ये होण्यासाठी वर्षा कॉर्पोरेट धनकवडी पुणे यांचे मार्फत थेट पद्धतीने खरेदी करून घेण्यात यावे. तसेच इयत्ता २ री, ३ री, ४ थी साठी ए/ फोर साईज(A4 Size), दर ५५ पैसे प्रति पान आणि इयत्ता ५वी, ६वी, ७वी, ८वी, ९वी, १०वी साठी १/A सेमी साईज (1/A cm Size) ४५ पैसे प्रती पानानुसार बायंडिंग करून त्वरित उपलब्ध करावी. विद्यार्थ्यांचे वेळेचे व शैक्षणिक नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी सदर विषयास वित्तीय मान्यता देण्याची मा.शिक्षण समिती सभेची मागणी असली तरी प्रस्तुत विषय प्रशासनाने तपासून नियमाधीन प्रस्ताव सादर करणेस मान्याता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३९० विषय क्रमांक- ०९

दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- स्थापत्य ड मुख्यालय

सुचक- मा.बनसोडे राजू अनुमोदक- मा.कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/५१९/२०२१, दि.२२/०९/२०२१.

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.CIVIL/HO/16/07/2021-22 अन्वये प्र.क्र.२६ पिंपळे निलख येथील कावेरीनगर, वेणुनगर व दत्त मंदीर परिसरात ठिकठिकाणी पेव्हिंग ब्लॉक बसविणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे कामी संजय कॉन्ट्रॅक्टर नि.र.रू.29,99,049/- (अक्षरी र.रु.एकोणतीस लाख नव्यान्नव हजार एकोणपन्नास फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.29,64,699/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त

ठेकेदाराकडून र.रु.29,64,699/- पेक्षा 35.35% कमी म्हणजेच र.रु.19,16,678 /- +रॉयल्टी चार्जेस र.रु.3,675/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.34,350/- = एकुण र.रु.19,54,703/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३९१ विषय क्रमांक- १०

दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- शिक्षण

सुचक- मा.बनसोडे राजू अनुमोदक- मा.कांबळे अंबरनाथ

सदंर्भ- मा.अति. आयुक्त(१) यांचे पत्र क्र.शि.मं./कावि/९अ/१३१/२०२१, दि.२७/०९/२०२१.

मा.अति. आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

“पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळाचे समुध्दीकरण” नियोजन या विषयाची बैठक १५ जुलै २०२१ सकाळी १०.३० वाजता ऑटो क्लस्टर, चिंचवड येथे आयोजित करणेत आलेली होती. मनपा शाळांची गुणवत्ता वाढावी, पालक व समाजाचा या शाळाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलणे, महानगरपालिका क्षेत्रातील विविध समस्या व उपाययोजना करणे. कोविड काळात मुलाच्या शिक्षणात खंड पडलेला असून त्यामुळे उद्भवणा-या विविध कारणामुळे भविष्यातील शिक्षण, होणारी संभाव्य गळती, स्थालातंरण, मुलाची शाळातील नियमित उपस्थिती,उपलब्ध सोयीसुविधा, शैक्षणिक दर्जा, शासनाची ध्येय धोरणे, प्रकल्प, कार्यक्रम इ. बाबीवर गांभिर्याने विचार करणे. महापालिकेच्या शाळा शैक्षणिक दृष्टया समृध्द व अग्रेसर ठरल्या पाहिजेत म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळाचे समुध्दीकरण नियोजन करणे बैठक आयोजित करणेत आलेली होती. सदर बैठकीस मा. आयुक्त सो., अति.आयुक्त सो., संगणक विभागाचे अधिकारी, मा.आयुक्त शिक्षण विभाग, पुणे, मा.संचालक व उपसंचालक पुणे, एनजीओचे अधिकारी, प्रशासन अधिकारी, सहा.प्रशासन अधिकारी व इतर संबधित अधिकारी उपस्थितीत होते. सदर बैठकीस हॉटेल कलासागर याचे कडून एकवेळेसचे चहापाणी व जेवण मागविणेत आलेले होते. याकामी एकवेळेसचे अल्पोहार व जेवणाचे बिल र.रू.६३,०००/- (अक्षरी र.रू.त्रेसष्ठ हजार फक्त ) हॉटेल कलासागर, पिंपरी यांनी सादर केलेले आहे. सदर बिलापोटी झालेला खर्च र.रू.६३,०००/- हॉटेल कलासागर यांना अदा करणेस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३९२ | विषय क्रमांक- ११
दिनांक- ०६/१०/२०२१ | विभाग- विद्युत
सुचक- मा.कांबळे अंबरनाथ | अनुमोदक- मा.अभिषेक बारणे
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.विमुका /४/कावि/९४३/२०२१ दि.२७/०९/२०२१.
विषय- अ क्षेत्रिय कार्यायल अंतर्गत प्रभाग क्र.१५ मधील नाट्यगृह मध्ये साऊंड सिस्टिम तसेच स्टेजवरील लाईट व अनुषंगिक कामे करणे. (निविदा नोटीस क्र.03-01/2021-2022)

विषय क्र.११चा विचार पुढील सभेचेवेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३९३ | विषय क्रमांक- १२
दिनांक- ०६/१०/२०२१ | विभाग- स्थापत्य BSUP प्रकल्प
सुचक- मा.कांबळे अंबरनाथ | अनुमोदक- मा.अभिषेक बारणे
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/ BSUPप्र./४६३/२०२१, दि.२७/०९/२०२१.
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकातील झोनिपू स्थापत्य विभाग महसुली अंदाजपत्रक या लेखाशिर्षावरील कामांसाठी अदा करावयाच्या देयकांसाठी तरतुद अपुरी असल्याने खालील प्रमाणे विभागाअंतर्गत तरतुद वर्गीकरण करणे गरजेचे आहे.

| अक्र | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र. | अ.क्र | सन २०२१-२२ चा मुळ अंदाज | वर्गीकरण व आवश्यकतेनुसार होणारी | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | JnNURM-BSUP शहर झोपडपट्टी पुनर्वसन अंतर्गत लिंकरोड पत्राशेड ८ अ मधील इमारतींची स्थापत्य, पाणीपुरवठा, विद्युत, जलनिःसारण कामांची दुरुस्तीची कामे करणे. | झोनिपू स्थापत्य विभाग, महसुली | ८०५ | १६७ | ३,००,००,०००/- | ० | ४०,००,०००/- | सदर कामाची निविदा कार्यवाही चालू असून या आर्थिक वर्षासाठीची तरतुदी पुरेशी आहे. |
| २ | शहर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत अजंठानगर, विठ्ठलनगर येथील प्रकल्पामधील इमारतींची लिफ्ट खरेदी करणे व (AMC) करणे. | झोनिपू स्थापत्य विभाग, महसुली | ७९८ | ३८ | ० | ४०,००,०००/- | ० | सदर काम अंतिम करणेकामी वाढीव तरतुद आवश्यक आहे. |
| | एकुण रक्कम रुपये | | | | ३,००,००,०००/- | ४०,००,०००/- | ४०,००,०००/- | |

तरी वरीलप्रमाणे विभागाअंतर्गत कामासाठी तरतुद वर्गीकरणाचा प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. (वाढ/घट र.रु.४०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३९४ विषय क्रमांक- १३
दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- स्थापत्य उद्यान
सुचक- मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा.अभिषेक बारणे
संदर्भ- मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/उद्यान/३७०/२०२१, दि.२७/०९/२०२१.

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य उद्यान कडील सोबत जोडलेल्या प्रपत्र अ(१ ते १) मधील विकास कामांचे प्राप्त अधिकारात निविदा प्रक्रिया पुर्ण करुन, कामाचे आदेश निर्गत केले आहेत. तथापि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ ड नुसार अवलोकन अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३९५ विषय क्रमांक- १४
दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- बीआरटीएस स्थापत्य
सुचक- मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा.अभिषेक बारणे
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/ बीआरटीएस/१८८८/२०२१, दि.२८/०९/२०२१.
विषय- मुंबई- पुणे रस्ता नाशिक फाटा येथे उड्डाणपूल बांधणे.

विषय क्र.१४चा विचार दि.२०/१०/२०२१ च्या सभेचेवेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३९६ विषय क्रमांक- १५
दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- वैद्यकीय
सुचक- मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसांभा/४/कावि/८९२/२०२१, दि.२७/०९/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने प्रसीध्द केलेल्या EOI प्रमाणे मे.रुबी एल केअर सर्व्हीसेस यांना कोविड केअर सेंटर सुरु करणेकामी बालनगरी, भोसरी कामकाज आदेश देण्यात आले होते. कोरोना रुग्ण कमी झाले नंतरही सदर कोविड सेंटर चालु ठेवणेत आले होते. सदर संस्थेस दि.०३.०८.२०२१ ते ०२.०९.२०२१ पर्यंत ३०० बेडसाठी मुदतवाढ देण्यात आलेली होती. दि.३१.०८.२०२१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये त्यांना दि.०३.०९.२०२१ ते १७.०९.२०२१ पर्यंत मुदतवाढ देणेकामी निर्णय घेणेत आला आहे. मे.रुबी एलकेअर सर्व्हीसेस यांना ३०० बेडसाठी एकूण र.रु.३८,२५,०००/- चे कामकाज आदेश देणेत आले आहे. EOI ०३/२०२०-२१ मधील अटी शर्तीशी संलग्न राहून त्यांना कामकाज आदेश देण्यात आलेले आहेत. सदर खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३९७ विषय क्रमांक- १६
दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- क्रीडा
सुचक- मा.बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा.बारणे अभिषेक

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/३००/२०२१, दि.१४/०९/२०२१.
२) मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतीक समिती सभा ठराव क्र.४३ दि.२४/०९/२०२१.

मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतीक समिती सभा ठराव क्र.४३ दि.२४/०९/२०२१.अन्वये मा.स्थायी समिती सभा सदस्य ठराव क्र.६९६० दि.११/०३/२०२० अन्वये मा.अतिरिक्त आयुक्त(३) यांचेकडील आदेश क्रमांक क्रीडा/०३/२१८/२०२० दि.२४/०७/२०२० अन्वये प्रभाग क्र.१८ चिंचवड कै.दिनकर गजाबा भोईर व्यायामशाळा हि उत्कर्ष मित्र मंडळ माणिक कॉलनी चिचवड या संस्थेस या संस्थेस दरमहा र.रु.२०००/- म.न.पा.कडून देवून ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास दिलेल्या व्यायामशाळेची मुदत दि.२३/०६/२०२१ संपुष्टात आलेली आहे. उत्कर्ष मित्र मंडळ माणिक कॉलनी चिचवड दि.२८/०७/२०२१ चे मागणी पत्र व अशोक पटेकर क्रीडा पर्यवेक्षक ब क्षेत्रिय कार्यालय यांच्या दि.०५/०८/२०२१ च्या अहवालानुसार व मनपाची क्रिडाधोरानुसार कै.दिनकर गजाबा भोईर व्यायामशाळा हि उत्कर्ष मित्र मंडळ माणिक कॉलनी चिचवड या संस्थेस आदेशाच्या तारेखेपासून दरमहा र.रु.२०००/- मनपा कडून देवून ११ महिने कराराने व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास मुदतवाढ देणेकामी मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३९८ विषय क्रमांक- १७
दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- क्रीडा
सुचक- मा.बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा.बारणे अभिषेक

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/२०३/२०२१, दि.२०/०९/२०२१.
२) मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतीक समिती सभा ठराव क्र.४४ दि.२४/०९/२०२१..

मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतीक समिती सभा ठराव क्र.४४ दि.२४/०९/२०२१. अन्वये पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या वतीने नागरिकांसाठी खालील प्रमाणे १२ जलतरण तलाव चालविले जातात. १२ जलतरण तलावापासून खालील प्रमाणे एकूण उत्पन्न मिळालेले आहे.

| **अ.क्र.** | **जलतरण तलाव** | **सन २०१७-१८ मिळालेले उत्पन्न** | **सन २०१८-१९ मिळालेले उत्पन्न** |
|---|---|---|---|
| **१** | १२ जलतरण तलावापासून मिळालेले उत्पन्न | **६२,९८,४६४/-** | **६८,१९,६९५/-** |

**वरील १२ जलतरण तलाव चालविणे कामी सन २०१७-१८ मध्ये खालील प्रमाणे अंदाजे वार्षिक खर्च आलेला आहे.**

| अ.क्र. | खर्चाचा तपशिल | सन २०१७-१८ करिता अंदाजे खर्च |
|---|---|---|
| १ | आस्थापना खर्च= १२ तलाव,प्रत्येक तलावावर १ लिपिक व अंदाजे ४ जीवरक्षक यांचा वार्षिक वेतन खर्च | १,७३,२०,१७६/- |
| २ | सुरक्षा कर्मचारी खर्च | ६४,७६,४००/- |
| ३ | स्थापत्य विषयक अंदाजे खर्च = | ४६,९४,१९३/- |

| | | |
|---|---|---|
| ४ | विद्युत बिल अंदाजे (सन २०१७-१८ वीज बिल खर्च) | ७०३७८७०/- |
| ५ | १२ जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परीसर स्वच्छता, साफ सफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाज साठी सन २०१७-१८ मध्ये प्रत्यक्ष झालेला खर्च | १,२५,८४,३८५/- |
| | अंदाजे वार्षिक खर्च र.रु. | ४,८१,१३,०२४/- |

सन २०१७-१८ मध्ये १२ जलतरण तलावाकरिता अंदाजे एकूण वार्षिक खर्च र.रु.४,८१,१३,०२४/- इतका येत आहे व १२ जलतरण तलावापासून सन २०१७-१८ मध्ये एकूण वार्षिक उत्पन्न र.रु.६२,९८,४६४/- इतके मिळालेले आहे. १२ जलतरण तलावावर होणारा खर्च व मिळणारे उत्पन्न याचा विचार करता म.न.पा.स वार्षिक खर्च र.रु.४,८१,१३,०२४/- वजा वार्षिक उत्पन्न र.रु.६२,९८,४६४/- = र.रु.४,१८,१४,५६०/- इतका वार्षिक बोजा पडत आहे. मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७अ/कावि/२२१/२०१४ दि.३०/६/२०१४ अन्वये म.न.पा. विविध क्रीडा सुविधा दर पूर्वीप्रमाणे लागू करणेस मान्यता दिली असून त्यानुसार आदेशाचे तारखेपासून आजता गायत जलतरण तलाव दरपत्रक खालील प्रमाणे आकारले जात आहे.

| अ.क्र. | तपशिल | तिमाही दर र.रु. | सहामाही दर र.रु. | वार्षिक दर र.रु. |
|---|---|---|---|---|
| | | जुने दर र.रु. | जुने दर र.रु. | जुने दर र.रु. |
| १ | १२ वर्षाखालील मुले /मुली | २००/- | ३५०/- | ५००/- |
| २ | १२ वर्षावरील व्यक्ती | ४००/- | ७००/- | १०००/- |
| ३ | अपंग, म.न.पा.कर्मचारी स्वतः, राज्य राष्ट्रीय, अंतर राष्ट्रीय खेळाडू, जेष्ठ नागरिक पत्रकार | २००/- | ३५०/- | ५००/- |
| ४ | लॉकर फी | ५०/- | ७५/- | १००/- |
| ५ | १ व्यक्तीसाठी, स्वतःसाठी गेस्ट तिकीट | प्रती दिन गेस्ट तिकीट र.रु.१०/- | | |

म.न.पा.जलतरण तलावाचे मिळणारे उत्पन्न व त्यावर होणारा खर्च यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत येत असल्याने ही तफावत कमी करण्यासाठी जलतरण तलाव शुल्कामध्ये खालील प्रमाणे वाढ करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | शुल्काचा तपशिल | दर र.रू. |
|---|---|---|
| १ | दैनंदिन शुल्क(प्रती दिन गेस्ट तिकीट) | ३०/- |
| २ | सर्व साधारण मासिक शुल्क | ६००/- |
| ३ | सर्व साधारण त्रैमासिक शुल्क | १,२००/- |
| ४ | सर्व साधारण सहामाही शुल्क | २,१००/- |
| ५ | सर्व साधारण वार्षिक शुल्क | ३,०००/- |
| ६ | एक वेळेचे सभासद शुल्क व नोंदणी शुल्क | ३००/- |
| ७ | लॉकर फी | तिमाही = रु.१५०/-<br>सहामाही= रु.२००/-<br>वार्षिक= र.रु.३००/- |

| | | |
|---|---|---|
| ८ | नेहरूनगर जलतरण तलाव - सराव ,शिबिर अथवा स्पर्धा करिता सार्वजनिक संस्था, शाळा, कॉलेज,कंपनी ,क्लब यांना १ तासाचे भाडे | १,५००/- |
| ९ | इतर जलतरण तलाव - सराव ,शिबिर अथवा स्पर्धा करिता सार्वजनिक संस्था, शाळा, कॉलेज यांना १ तासाचे भाडे | १,२००/- |
| १० | विद्यार्थी खेळाडू जलतरण प्रशिक्षण शुल्क (मासिक) =१तास करिता | १,५००/- |
| ११ | १८ वर्षाखालील मुले, मुली यांना मासिक, त्रैमासिक, सहामाही, वार्षिक शुल्कामध्ये सर्वसाधारण शुल्काच्या ५० % सवलत राहील. | |
| १२ | म.न.पा.अधिकारी व कर्मचारी, राष्ट्रीय खेळाडू, पत्रकार, जेष्ठ नागरिक यांना मासिक, त्रैमासिक, सहामाही, वार्षिक शुल्कामध्ये सर्वसाधारण शुल्काच्या ५०% सवलत राहील. | |
| १३ | महानगरपालिका फक्त सदस्य, खेळाडू दत्तक योजना-खेळाडू, म.न.पा.शाळेतील विद्यार्थी खेळाडू, दिव्यांग विद्यार्थी/ दिव्यांग नागरिक यांना सर्वसाधारण शुल्काच्या १००% सवलत राहील. (मोफत) | |

तरी वरील प्रमाणे म.न.पा जलतरण तलावाचे शुल्कामध्ये वाढ करणेस व जलतरण तलाव ५ वर्षे भाडे कराराने चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३९९ विषय क्रमांक- १८

दिनांक- ०६/१०/२०२१

सुचक- मा.बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा.बारणे अभिषेक

संदर्भ- मा.रेखा दर्शले व मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव.

मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतीक समिती सभा ठराव क्र.४५ दि.२४/०९/२०२१. अन्वये गेली दिड दोन वर्षे कोविड १९ च्या साथीमुळे म.न.पा. परिसरातील नागरिकांची प्रतिकार शक्ती कमी झालेली आहे. त्यांच्या प्रतिकार शक्तीमध्ये वाढ होण्याच्या दृष्टीने म.न.पा. परिसरामध्ये खेळांच्या सरावामध्ये वाढ होणे आवश्यक आहे. सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, पुणे जिल्हा आणि मेट्रोपॉलिटन बॅडमिंटन असोसिएशन, पुणे यांचे मान्यतेने व सी.टी.ओ. कार्यालय यांच्या सहकार्याने संत ज्ञानेश्वर महाराज क्रीडा संकुल, इंद्रायणीनगर, भोसरी येथे पिपंरी चिंचवड शहरातील नागरिकांसाठी जिल्हास्तर बॅडमिंटन स्पर्धा २०२१ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे र.रू.२,०६,३००/- चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व तसेच ट्रॉफीज, पी.व्ही.सी. फ्लेक्स बॅनर, प्रमाणपत्रे छपाई इ. कोटेशन नोटीस प्रसिध्द करून करणेस, सदरचा खर्च हा क्रीडा विभागाचे क्रीडानिधी - मनपा तर्फे आयोजित विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस तसेच स्पर्धा अनुषंगाने स्टेज, टेबल-खुर्च्या इ. व्यवस्थे बाबतचा स्थापत्य विषयक खर्च हा संबंधित स्थापत्य विभाग कार्यालय व स्पर्धा ठिकाणी विद्युत स्पिकर, माईक व जनरेटर व्यवस्था करणे बाबतचा विद्युत विषयक खर्च हा संबंधित क्षेत्रिय कार्यालय, विद्युत विभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०४०० विषय क्रमांक- १९

दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- पाणीपुरवठा

सुचक- मा.बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा.बारणे अभिषेक

संदर्भ- मा.रेखा दर्शले व मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव.

मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतीक समिती सभा ठराव क्र.४७ दि.२४/०९/२०२१. अन्वये प्रभाग क्रमांक १३, सेक्टर नं २२ ओटा स्कीम निगडी येथील राजर्षी शाहू महाराज व्यायामशाळा ही आदर्श स्पोर्टस क्लब श्री गणेश दत्त चॅरिटेबल ट्रस्ट रजि. नंबर एफ - १५३२८/९८ अण्णाभाऊ साठेनगर निगडी ४११ ०४४ या संस्थेस म.न.पा.चे क्रीडा धोरण भाग - २ विविध क्रीडा सुविधा मधील अटी व शर्तीनुसार दरमहा र.रू.२०००/- म.न.पा कडून सेवाशुल्क देऊन ११ महिने कराराने व्यायामशाळा आदेशाच्या तारखेपासून सेवाशुल्क तत्वावर चालविणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०४०१ विषय क्रमांक- २०

दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- वायसीएमएच

सुचक- मा.बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.रेखा दर्शले व मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव.

मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतीक समिती सभा ठराव क्र.४८ दि.२४/०९/२०२१. अन्वये कै.मधुकर पवळे क्रीडांगण निगडी, येथे मोठे मैदान, व्यायाम शाळा, स्पर्धा परिक्षा केंद्र कार्यरत आहे. तसेच सदर ठिकाणी स्टेज ही बांधलेले आहे. या क्रीडा सुविधांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिने तेथे निवासी सुरक्षा कर्मचारी नेमणेकामी, सुरक्षा कर्मचारी निवास बांधणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०४०२ विषय क्रमांक- २१

दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- जलनि:सारण ह क्षेत्रिय

सुचक- मा.बनसोडे राजू अनुमोदक- मा.कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा.अति. आयुक्त(१) यांचे पत्र क्र.हक्षेका/जनि/कावि/८५४/२०२१, दि.२८/०९/२०२१.

मा.अति. आयुक्त(१) यांना शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ह क्षेत्रीय कार्यालय हद्यीतील मलनि:सारण नलिका मॅनहोल चेंबर्सची साफसफाई आधुनिक यांत्रिकी पध्दतीने करणेचे काम मे.आर्यन पंप्स अॅण्ड एनव्हायरो

सोल्युशन प्रा.लि.यांना मा. स्थायी समिती ठराव क्र.७५२४ दि.०७.१०.२०२० नुसार करारनामा शर्तीनुसार दि.०६/०१/२०२१ च्या आदेशान्वये कामाचे आदेश देणेत आलेले होते. सदर कामाची मुदत दि.१८/०९/२०२१ पर्यंत आहे. निविदा अटी व शर्ती(A) क्र.३ नुसार सदर निविदेतील दर हे निविदा कालावधी पर्यंत कायम राहतील. सदर निविदेचा कार्य कालावधी ०७ (सात) वर्षे आहे. तथापि कामाचा आदेश व करारनामा हा ०१ (प्रथम) वर्षासाठी देणेत आलेला आहे. त्यानंतर कामाची प्रगती, Performance विचारात घेऊन पुढील प्रत्येक वर्षासाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने मुदतवाढ देणेत येईल. तसेच निविदा अटी व शर्तीनुसार एक वर्षानंतर भाववाढ फरक देय राहील. त्यानुसार ठेकेदाराने सदरचे काम दोन वर्षात समाधानकारक पूर्ण केलेले आहे. तृतीय वर्षासाठी (१८.०९.२०२२ पर्यंत) मा.स्थायी समितीची मंजुरी प्राप्त करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकात पान क्र.७७२ अ.क्र. 'ह' वर र.रु.७४,००,०००/- तरतुद नमूद करणेत आलेली आहे. निविदा अटी व शर्ती (A)क्र.३ नुसार मा. स्थायी समितीने ठरावात नमूद केलेला १ वर्षे कालावधीची मुदत दि.१८/०९/२०२१ रोजी पुर्ण होत आहे. वर नमूद केलेनुसार ठेकेदार मे.आर्यन पंप्स ॲण्ड एनव्हायरो सोल्युशन प्रा.लि. यांस पिंपरी चिंचवड महानगरपालिका ह क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील मलनिःसारण नलिका मॅनहोल चेंबर्सची सफाई आधुनिक यांत्रिकी पद्धतीने करणे (सक्शन, जेटींग सह रिसायकलिंग मशिनच्या सहाय्याने). या कामास दि.१९/०९/२०२१ पासून १८/०९/२०२२ पर्यंत तृतीय वर्षासाठी मुदतवाढ मिळणेस व भाववाढ फरक एक वर्ष कालावधीनंतर अदा करणे व या कालावधीसाठी र.रु.१,२९,००,०००/- (अक्षरी र.रु.एक कोटी एकोणतीस लाख फक्त) च्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक- १०४०३ | विषय क्रमांक- २२ |
| दिनांक- ०६/१०/२०२१ | विभाग- स्थापत्य ग क्षेत्रिय |
| सुचक- मा.भोईर सुरेश | अनुमोदक- मा.कांबळे अंबरनाथ |

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.गक्षेका/स्था/कावि/३०५/२०२१, दि.२५/०९/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांना शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगर पालिकेचे ग क्षेत्रिय स्थापत्य विभागातील सन २०२१-२०२२ या वर्षाकरिता वाहनइंधन या लेखाशीर्षाकरिता र.रु.१,५०,०००/- इतकी तरतूद करणेत आली होती, परंतु आयुक्त यांचेकडील आदेश क्र.प्रशा/१/कावि/३४६/२०२१ दि:-२२/०४/२०२१ अन्वये कोरोना विषाणू कोविड-१९ चा आदेश कार्यकारी अभियंता यांना प्राप्त झाला आहे, तसेच ग क्षेत्रिय व इ क्षेत्रिय स्थापत्य विभागाच्या कामकाजासाठी वाहन इंधन तरतूद कमी पडत आहे. ग क्षेत्रिय कार्यालयाचे स्थापत्य विभागातील वाहन इंधन या लेखाशीर्षाअंतर्गत दि.०१/०४/२०२१ पासून १० देयके अदागयी करिता र.रु.९०,०००/- इतका खर्च झाला असून आज अखेर र.रु.६०,०००/- इतके शिल्लक आहेत. सन २०२१-

२०२२ या वर्षाकरिता अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षकावर र.रु.३,६०,०००/- तरतूद केलेली आहे. सद्यस्थितीत सदर रकमेतून २७,०००/-, इतका खर्च झालेला आहे त्यातून तरतूद वर्ग करणे शक्य आहे. तरी अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षाकातून र.रु.१,००,०००/-(अक्षरी र.रु.एक लाख फक्त) इतकी रक्कम वाहन इंधन या लेखाशिर्षाकावर वर्गीकरणांद्वारे उपलब्ध करणे शक्य आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ अनुसूचित ड मधील प्रकरण क्र.७ तरतूद क्र २(१) नुसार अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षामधून, वाहन इंधन अधिकारी या लेखाशीर्षावर र.रु.१,००,०००/-(अक्षरी र.रु.एक लाख फक्त) तरतूद वर्ग करणेस महाराष्ट्र महापालिका अधिनियम १०३ नुसार मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०४०४ विषय क्रमांक- २३

दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- आरोग्य मुख्यालय

सुचक- मा.बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आमुका/२/कावि/२५२/२०२१, दि.२५/०९/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांना शिफारस केले प्रमाणे.

मनपाचे आरोग्य मुख्य कार्यालय स्वच्छ भारत अभियानांतर्गत शहरातील नागरिकांना होम कंपोस्टींग यंत्रणा उभारणेकामी महानगरपालिकेमार्फत कंपोस्ट बिन्स खरेदीकरिता अनुदान कमाल र.रु.१,४००/- बँक खात्यावर (DBT) द्वारे वितरित करणेकामी व त्यापोटी होणा-या अंदाजित र.रु.५६,००,०००/- (अक्षरी र.रु.छपन्न लाख फक्त)चे खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०४०५ विषय क्रमांक- २४

दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- वैद्यकीय

सुचक- मा.बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/२/कावि/८९४/२०२१, दि.२७/०९/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांना शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रा मध्ये कोरोना विषाणू चा प्रादुर्भाव वाढल्यानंतर PMRDA मार्फत कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम येथील जंबो कोविड रुग्णालय सुरु करणेत आले होते तिथे पॅथॉलॉजी लॅब साठी मुनुष्यबळ पुरविणेकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत EOI प्रसीध्द करणेत आला होता. त्या मध्ये मे.माहेश्वरी सेल्स कॉर्पोरेशन यांचे लघुत्तम दरा प्रमाणे आदेश क्र.मसाभां/४/कावि/१९३/२०२१दि.१६.०३.२०२१ रोजी आदेश देणेत आले होते. भारतीय साथरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महानगरपालिका अधिनियम कलम ६३(६) व

कलम ६७(३) क नुसार कोरोना विषाणुचा (COVID19) प्रादुर्भाव लक्षात घेता जंबो कोविड रुग्णालय दि.१५.०९.२०२१ पर्यंत २०० बेडसाठी सुरु ठेवण्याचे मा.आयुक्त यांचे सुचने प्रमाणे कार्यकारणी समिती मध्ये निर्णय घेणेत आला आहे. कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम येथील जंबो कोविड रुग्णालयात पॅथ लॅबसाठी मनुष्यबळ पुरविणेकामी दि.३०.०५.२०२१ ते १२.०९.२०२१ (१०७दिवस) एकूण र.रु.६,८३,४९७.९२ (अक्षरी र.रु.सहा लाख त्रेऐंशी हजार चारशे सत्यान्नव रुपये ब्यांन्नव पैसे फक्त) एवढा खर्च येणार आहे. सदर खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०४०६ विषय क्रमांक- २५

दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- आरोग्य अ क्षेत्रिय

सुचक- मा.बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे पत्र क्र.अक्षेका/आ/२/कावि/४२८/२०२१, दि.२८/०९/२०२१.

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अ - क्षेत्रीय कार्यालय, आरोग्य विभागामार्फत डेंग्यू/ मलेरिया आजारांचा प्रादु् र्भावरोखण्यासाठी औष्णिक धुरीकण कामासाठी ३पिक अप व्हॅन/ रिक्षा टेम्पो वाहने भाड्याने पुरविणे कामाची मुदत दि.०२/०७/२०२१ रोजी संपुष्टात येत असल्याने व सदर कामाची नविन नि.नो.क्र.१/२०२०-२१ रद्द झाल्याने कामाची निकड विचारात घेता सदरचे कामास मुदतवाढ देणे आवश्यक असल्याने सद्या कामकाज करणारी संस्था मे.रामचंद्र एन्टरप्रायजेस यांनानिविदा नोटीस क्र.९/२०१८-१९ च्या मान्य निविदा दराने म्हणजेच र.रू.५९५.१९ प्रतिवाहन प्रतिदिन याप्रमाणे ३ वाहनांचे ३ महिनेसाठी र.रू.१,३९,२७५/- व उर्वरित ३ महिन्यासाठी ४ वाहनांचे र.रू.१,८५,७००/- याप्रमाणे दि.०३/०७/२०२१ पासून ६ अथवा नविन निविदा कार्यवाही प्रस्तावित होऊन कामाचे आदेश देईपर्यतच्या कालावधीसाठी मुदतवाढ देणे व याकामी येणा-या अंदाजे र.रु.३,२४,९७५/-(अक्षरी र.रु.तीन लाख चोविस हजार नउशे पंचाहत्तर फक्त) अथवा प्रत्येक्ष येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०४०७ विषय क्रमांक- २६

दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- स्थापत्य क मुख्यालय

सुचक- मा.भोईर सुरेश अनुमोदक- मा.बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/८९६/२०२१, दि.२९/०९/२०२१.

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.43/100/2020-21 अन्वये प्रभाग क्र.६ मधील गुळवे वस्ती, भगत वस्ती व परिसरात स्थापत्य विषयक सुधारणेची कामे करणे कामी मे.सचिन रमेश

वरात नि.र.रू.44,98,113/- (अक्षरी र.रु.चव्वेचाळीस लाख अठ्ठयान्नव हजार एकशे तेरा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.44,43,563/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.44,43,563/- पेक्षा 17.00% कमी म्हणजेच र.रु.36,88,157/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.20,800/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.54,550/- = एकुण र.रु.37,63,507/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०४०८ विषय क्रमांक- २७

दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- माहिती व तंत्रज्ञान

सुचक- मा.भोईर सुरेश अनुमोदक- मा.बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मातंवि/२/कावि/११०/२०२१, दि.२७/०९/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

दि. ४ मार्च २०२१रोजी मा.आयुक्तसो. यांचे समवेत मा.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी तथा CSR प्रमुख, श्री.विजय वावरे, CSR EXPERT, श्रीम.श्रुतिका मुंगी, CSR सहाय्यक सल्लागार झालेल्या बैठकीत सेक्शन८ या कायद्यानुसार कंपनी स्थापन करणेबाबत मा.आयुक्तसो. यांनी निर्देश दिलेले होते. त्या अनुषंगाने विकासात्मक उपक्रम राबविणेकरीता सेक्शन८ (Section 8 Act) या कायद्यानुसार SPV कंपनी स्थापन करणेचे प्रस्तावित आहे.कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय भारत सरकारने, 'कंपनी कायदा २०१३' मध्ये CSR (Corporate Social Responsibility) संदर्भात काही तरतुदी केल्या आहेत. त्या नुसार कलम135 (1) द्वारे ज्या कंपनी चे[ तत्पूर्वीचे आर्थिक वर्षात] (अ) निव्वळ मूल्य रुपये500 कोटी किंवा(ब) उलाढाल रुपये 1000 कोटी किंवा (क)निव्वळ नफा रुपये 5 कोटी असेल तर त्या कंपनीस C.S.R (Corporate Social Responsibility) म्हणजेच'कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व' अंतर्गत उपक्रम घेणे अनिवार्य करणेत आले आहे. C.S.R माध्यमातून खर्च केली जाणारी रक्कम याबाबत[कलम १३५(५)] नुसार' प्रत्येक कंपनीने प्रत्येक वित्तीय वर्षात कंपनीने खर्च केल्याची खात्री करून घ्यावी, जे आधीच्या तीन आर्थिक वर्षात केलेल्या कंपनीच्या सरासरी निव्वळ नफ्याच्या किमान दोन टक्के असेल' असे नमूद केले आहे. फेब्रुवारी २०१४ ते जानेवारी २०२१ कॉर्पोरेट व्यवहारमंत्रालयाने वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना व शुद्धिपत्रके नुसारCSR संदर्भातील अधिनियम अस्तित्वात आले आहेत.

'कंपनी कायदा २०१३' नुसार कंपन्या त्यांच्या‘कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी पॉलिसीजमध्ये’ संबंधित उपक्रम समाविष्ट करू शकतात: -

(१) उपासमार, दारिद्र्य आणि कुपोषण मिटवणे. [प्रतिबंधात्मक आरोग्य सेवेसह आरोग्य सेवेला प्रोत्साहन देणे, स्वच्छता आणि सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे.]

(२) विशेष शिक्षण आणि रोजगार विशेषत: मुले, स्त्रिया, वृद्ध आणि अपंग आणि उपजीविका वाढीच्या प्रकल्पांमध्ये व्यवसाय कौशल्य वाढविण्यासह शिक्षणाचा प्रसार करणे.

(३) स्त्री-पुरुष समानतेला प्रोत्साहन देणे, महिलांचे सक्षमीकरण करणे, महिला आणि अनाथांसाठी घरे आणि वसतिगृहे उभारणे. ज्येष्ठ नागरिकांसाठी वृद्धाश्रम, डे केअर सेंटर आणि अशा इतर सुविधा उभारणे आणि सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास गटांना भेडसावणाऱ्या असमानता कमी करण्याच्या उपाययोजना.

(४) पर्यावरणीय स्थिरता, पर्यावरणीय संतुलन, वनस्पती आणि प्राण्यांचे संरक्षण, प्राणी कल्याण, कृषी वनीकरण, नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण आणि माती, हवा आणि पाण्याची गुणवत्ता राखणे सुनिश्चित करणे.

(५) राष्ट्रीय वारसा, कला आणि संस्कृतीचे संरक्षण यासह इमारतींचे पुनर्स्थापना आणि ऐतिहासिक महत्त्व असलेली ठिकाणे आणि कलाकृती; सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना; पारंपारिक कला आणि हस्तकलांचा प्रचार आणि विकास.

(६) सशस्त्र दलातील दिग्गज, युद्ध विधवा आणि त्यांचे आश्रित, [केंद्रीय सशस्त्र पोलिस दल(CAPF) आणि केंद्रीय पॅरा मिलिटरी फोर्सेस(CPMF) दिग्गज आणि विधवांसह त्यांचे आश्रित) यांच्या फायद्यासाठी उपाय.

(७) ग्रामीण खेळ, राष्ट्रीय मान्यता प्राप्त खेळ, पॅरालिम्पिक खेळ आणि ऑलिम्पिक खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रशिक्षण.

(८) पंतप्रधानांच्या राष्ट्रीय मदत निधी किंवा पंतप्रधान नागरिक सहाय्य आणि आपत्कालीन परिस्थिती निधीमध्ये मदत(PM CARES फंड) किंवा केंद्र सरकारने स्थापन केलेल्या इतर कोणत्याही निधीमध्ये योगदान व अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्गीय, अल्पसंख्यांक आणि महिलांचे सामाजिक आर्थिक विकास आणि आराम आणि कल्याणासाठी प्राधान्य देणे.

(९) (a)केंद्र सरकार किंवा राज्य सरकार किंवा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम किंवा केंद्र सरकार किंवा राज्य सरकारच्या कोणत्याही एजन्सीद्वारे अर्थसहाय्यित विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि औषध क्षेत्रातील इनक्यूबेटर किंवा संशोधन आणि विकास प्रकल्पांमध्ये योगदान आणि(b) सार्वजनिक अनुदानीत विद्यापीठांमध्ये योगदान, भारतीय तंत्रज्ञान संस्था(IITs), अणुऊर्जा विभाग(DAE) अंतर्गत स्थापित राष्ट्रीय प्रयोगशाळा आणि स्वायत्त संस्था, जैवतंत्रज्ञान विभाग(DBT), विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग(डीएसटी), फार्मास्युटिकल्स विभाग, आयुर्वेद, योग आणि निसर्गोपचार मंत्रालय, युनानी, सिद्ध आणि होमिओपॅथी(आयुष), इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय आणि इतर संस्था, म्हणजे संरक्षण संशोधन आणि विकास संस्था(DRDO), भारतीय कृषी संशोधन परिषद(ICAR), भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद(ICMR) आणि वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद(CSIR), शाश्वत विकास ध्येय(SDGs) ला

प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि औषधांमध्ये संशोधन करण्यात गुंतलेली आहे.

(१०) ग्रामीण विकास प्रकल्प

(११) झोपडपट्टी क्षेत्राचा विकास('झोपडपट्टी क्षेत्र' या शब्दाचा अर्थ असा असेल की केंद्र सरकार किंवा कोणत्याही राज्य सरकार किंवा इतर कोणत्याही सक्षम प्राधिकरणाने घोषित केलेले कोणतेही क्षेत्र सध्या लागू आहे.

(१२) आपत्ती व्यवस्थापन, मदत, पुनर्वसन आणि पुनर्रचना उपक्रमांसह.

सामान्य परिपत्रक क्रमांक06/2018 दिनांक28.05.2018 यात असे नमूद केले आहे की , कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी ॲक्टिव्हिटीजसाठी निर्धारित केलेली रक्कम खर्च करण्यासाठी कंपनी स्थानिक क्षेत्र आणि त्याच्या आसपासच्या क्षेत्रांना प्राधान्य देईल.

तसेच सी.एस.आर. / सी.ई.आर. उपक्रम राबविणेकामी व उपक्रमांची अंमलबजावणी करणेसाठी स्थापन करावयाच्या Special Purpose Vehicle [SPV]) मध्ये मा.आयुक्त सो. हे त्यांचे अध्यक्ष असतील त्यानुसार त्यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेतील ४ अधिकारी संचालक म्हणून नेमणूक करणेस मा.आयुक्त सो. तथा मा.अध्यक्ष यांना अधिकार राहतील.

सदरच्या प्रस्तावित विशेष उद्देश वहन (Special Purpose Vehicle [SPV]) मार्फत खालील कामकाज मुखत्वेकरून देणे गरजेचे आहे.

१. CSR संदर्भात सरकारच्या वतीने वेळोवेळी प्रसिद्ध होणारे तरतुदी,अधिसूचना,संशोधने, शुद्धिपत्रके याबाबत अद्यावत माहिती चे संकलन करणे व ते महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना तसेच शहराच्या संस्था व नागरिकांना अवगत करून देणे.

२. कंपन्यांना आरोग्य,शिक्षण, महिला व बाल सबलीकरण, कौशल्य विकास, पर्यावरण,दिव्यांग सबलीकरण प्रकल्प राबविण्याच्या दृटीने प्रोहत्साहित करणे असेच महानगर पालिके सोबत PPP ( Public Private Partnership) माध्यमातून वरील विषयावर'करार' (MoU) घडवून आणणे , आवश्यक असल्यास वरील विषयांवर स्वत्रंत प्रकल्पाची आखणी करणे व अंमलबजावणी करणे.

३. इतरFoundations, NGO s , Funding agencies यांच्याशी समन्वय साधून त्यांना आरोग्य,शिक्षण, महिला व बाल सबलीकरण, कौशल्य विकास, पर्यावरण,दिव्यांग सबलीकरण प्रकल्प राबविण्याच्या दृटीने प्रोहत्साहित करणे असेच महानगर पालिके सोबत ( Public Private Partnership) माध्यमातून वरील विषयावर'करार' (MoU) माध्यमातून वरील विषयावर'करार' घडवून आणणे.

४. शहरातील प्रश्नांचा अभ्यास करून, CSR च्या माध्यमातून राबविण्यात येऊ शकणारे प्रकल्प तयार करणे व तेCSR Forum तसेच इतरfunding agencies च्या व्यासपिठांवर त्याचे सादरीकरण करणे व त्यांच्याशी नियमित संपर्क आणि समन्वय साधून त्यासाठी आवश्यक ती साधन-सामग्री( आवश्यक ज्ञान, तंत्रज्ञान, निधी, मनुष्य बळ इत्यादी) उभी करण्यास प्रयत्न करणे.

५. महानगरपालिकेचे विकासाविषक प्रकल्प तसेच कार्यक्रमांचा अभ्यास करून त्यांचे‘मूल्य वर्धित’ करण्याच्या दृष्टीने आराखडा तयार करणे व तो वेगवेगळ्याForum सादर करून त्यासाठी लागणारी साधन-सामग्री( आवश्यक ज्ञान, तंत्रज्ञान, निधी, मनुष्य बळ इत्यादी) उभी करण्यास प्रयत्न करणे.

६. आपत्ती व्यवस्थापन तसेच इतर तातडीने करावयाच्या मदतीसाठी प्रयत्न करणे.

७. CSR अधिनियमांना विचारात घेऊनCSR संदर्भात महानगरपालिकेने दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी करणे.

८. इतर

९. CSR (Corporate Social Responsibility) / CER (Corporate Enviroment Responsibility – F.No.22-65/2017-IA.III) ची कार्यालय स्थापन करणे, अधिकारी/कर्मचारी यांचेकामी पिंपरी चिंचवड महापालिकेतून प्रतिवर्षी रक्कम रूपये १ कोटी तरतूद करून सदर कंपनीस प्रतिवर्षी रक्कम हस्तांतर करणे आवश्यक आहे. सबब उपरोक्तप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सी.एस.आर. / सी.ई.आर. उपक्रमांचे अंमलबजावणीसाठी मा.आयुक्त सो. यांचे अध्यक्षतेखाली विशेष उद्देश वहन(Special Purpose Vehicle [SPV])गठीत करणेस तसेच सदरच्या SPVकंपनीस व नमूद केलेल्या उपक्रमांचे कामकाज सोपविणेस मान्यता मिळणेकामी व तसेच महानगरपालिकेचे अंदाजपत्रकात प्रतिवर्षी रक्कम रूपये १ कोटी C.S.R. / C.E.R. साठी तरतूद करून सदर कंपनीकडे हस्तांतर करणेकामी सदरचा विषयास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०४०९ विषय क्रमांक- २८

दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- स्थापत्य ह मुख्यालय

सुचक- मा.भोईर सुरेश अनुमोदक- मा.बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.स्था/नि/ह-मुख्य/९७५/२०२१, दि.३०/०९/२०२१.

विषय- प्रभाग क्र.०८ येथील MIDC पोलिस स्टेशन इमारतीचे विस्तारीकरण करणे.

विषय क्र.२८चा विचार पुढील सभेचेवेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०४१० विषय क्रमांक- २९

दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- नगरसचिव

सुचक- मा.भोईर सुरेश अनुमोदक- मा.बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.नगरसचिव यांचे पत्र क्र.नस/१/कावि/११४५/२०२१, दि.२९/०९/२०२१.

मा.नगरसचिव यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नगरसचिव विभागातील कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजूरीकामी विनंती अर्ज सादर केलेले आहेत. संबंधित कर्मचा-यांचे विनंती अर्जानुसार सोबतचे

प्रपत्र अ मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजुरी कामीचे प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५७(तीन) अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०४११ विषय क्रमांक- ३०

दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- विद्युत

सुचक- मा.भोईर सुरेश अनुमोदक- मा.बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.विमुका/५/कावि/६७३/२०२१, दि.२८/०९/२०२१.

विषय- प्र.क्र.३ च-होली येथील आरक्षण क्र.2/81 खेळाचे मैदान विकसीत करणे व विद्युत विषयक कामे करणे. (टप्पा 2)

विषय क्र.३०चा विचार पुढील सभेचेवेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०४१२ विषय क्रमांक- ३१

दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- विद्युत

सुचक- मा.पाडाळे निता अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

संदर्भ- मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.विमुका/८/कावि/३९९/२०२१, दि.२९/०९/२०२१.

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या विद्युत विभागाकडील (निविदा क्र.१५/२३-२०२१-२२) अन्वये प्रभाग क्र. १४ मधील विद्युत व्यवस्थेचे देखभाल दुरुस्ती करणेबाबत मे.सनशाईन इलेक्ट्रीकल्स नि.र.रू.४६,५५,५४६/-(अक्षरी रक्कम रु. शेहचाळीस लाख पंचावन्न हजार पाचशे सत्तेचाळीस फक्त) पेक्षा २६.८५ % कमी या ठेकेदाराकडुन काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेकरीता मान्यतादेण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०४१३ विषय क्रमांक- ३२

दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- विद्युत

सुचक- मा.पाडाळे निता अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

संदर्भ- मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.विमुका/८/कावि/३९८/२०२१, दि.२९/०९/२०२१.

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या विद्युत विभागाकडील (निविदा क्र.१५/२४-२०२१-२२) अन्वये प्रभाग क्र. १५ मधील विद्युत व्यवस्थेचे देखभाल दुरुस्ती करणेबाबत मे.सनशाईन इलेक्ट्रीकल्स नि.र.रू.४६,५७,२७५/-(अक्षरी र.रु.शेहचाळीस लाख सत्तावन्न हजार दोनशे पंच्याहत्तर फक्त) पेक्षा २६.८१ % कमी या ठेकेदाराकडुन काम

करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेकरीता मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०४१४ विषय क्रमांक- ३३

दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- आरोग्य फ क्षेत्रिय

सुचक- मा.अभिषेक बारणे अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.फक्षेका/२/कावि/३६८/२०२१, दि.२९/०९/२०२१.

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, फ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील सार्वजनिक शौचालयाचे व मुता-यांची यांत्रिकी पद्धतीने (पाण्याचे उच्चदाब फवा-याच्या सहाय्याने) व मनुष्यबळाद्वारे दैनंदिन साफसफाई देखभाल दुरुस्ती करणे या कामासाठी मे.महर्षी वाल्मिकी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या. यांना दि.१०/०९/२०२१ पासुन २ महिने किंवा नविन निविदा प्रक्रिया पुर्ण होण्या अगोदर जे अगोदर असेल त्या कालावधीसाठी मुदतवाढ देवून त्याकरीता येणा-या एकुण खर्च र.रु.५,४८,५८९/-(अक्षरी र.रु.पाच लाख अठ्ठेचाळीस हजार पाचशे एकोणनव्वद फक्त) किंवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०४१५ विषय क्रमांक- ३४

दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- स्थापत्य अ मुख्यालय

सुचक- मा.फुगे भिमाबाई अनुमोदक- मा.सुजाता पालांडे

संदर्भ- मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/अ-मुख्य/२५०/२०२१, दि.२७/०९/२०२१.

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.35/1/2021-22 अन्वये प्रभाग क्र.१० मध्ये डांबरीकरणाची कामे करणे. (सन २०२१-२२) कामी M/s.SAIPRABHA CONSTRUCTION नि.र.रू.37,49,523/-(अक्षरी र.रु.सदोतिस लाख एकोणपन्नास हजार पाचशे तेवीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.36,72,823/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.36,72,823/- पेक्षा 39.03% कमी म्हणजेच र.रु.22,39,320/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.6,199/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.76,700/- = एकुण र.रु.23,22,219/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०४१६ विषय क्रमांक- ३५

दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- अ क्षेत्रिय

सुचक- मा.फुगे भिमाबाई अनुमोदक- मा.सुजाता पालांडे

संदर्भ- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे पत्र क्र.अक्षेका/लेखा/७/कावि/१९४/२०२१, दि.२९/०९/२०२१.

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रीय कार्यालयाकडील सोबतचे प्रपत्र ' अ ' (1ते8) मधील स्थापत्य विभागाचे विकास कामांचे प्राप्त अधिकारात निविदा प्रक्रिया पुर्ण करुन, कामाचे आदेश निर्गत केले आहेत. तथापि, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 73 (ड) नुसार प्रस्तुत विषयाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०४१७ विषय क्रमांक- ३६

दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- प्रशासन

सुचक- मा.सुरेश भोईर अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१८/कावि/८१०/२०२१ दि.३०/०९/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघ यांनी सन २०२०-२०२१ आणि त्यापुढील चार वर्षासाठी महापालिका आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचा-यांना प्रथा बोनस व सानुग्रह अनुदान मिळण्याकामी मागणी केलेली आहे. ८.३३% सानुग्रह अनुदान व जादा रक्कम या संदर्भात मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली मा.उपमहापौर, मा.आयुक्त, मा.अध्यक्ष-स्थायी समिती, मा.पक्षनेते, मा.विरोधीपक्ष नेते व इतर पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी महासंघाचे प्रतिनिधी यांच्या मध्ये दिनांक२७/०९/२०२१ रोजी चर्चा आयोजित करण्यात आली होती. या चर्चेमध्ये महापालिका आस्थापने वरील सर्व अधिकारी व कर्मचा-यांना सन२०२०-२०२१ यावर्षासह पुढील ४ वर्षासाठी (सन-२०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४, व २०२४-२५ असे ५ वर्षा पर्यंत) ८.३३% सानुग्रह अनुदान व जादा र.रु.२०,०००/-म्हणून मान्यता प्राप्त संघटने बरोबर करारनामा करुन मंजूर करावे. असा निर्णय झालेला आहे तसा दि.२७/०९/२०२१ रोजीचा सभावृत्तांत दि.३०/०९/२०२१ रोजी प्राप्त झालेला आहे. ८.३३% सानुग्रह अनुदान व जादा र.रु.२०,०००/- अदायगी कामी खालीलप्रमाणे निकष प्रस्तावित करण्यात येत आहेत.

१) सन २०२०- २१ मध्ये जे कार्यरत अधिकारी / कर्मचारी वेतनश्रेणीमध्ये आहेत. त्यांना व रजा राखीव वैद्यकिय अधिकारी आणि रजा राखीव नर्सेस यांना एक महिन्याच्या वेतनाइतकी वित्तलब्धी (इतर भत्ते वगळून) म्हणजेच ८.३३% इतकी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून व जादा र.रु.२०,०००/- देय राहील. एका वर्षामध्ये सहा महिन्या पासून पूर्ण वर्षापर्यंत सलग सेवेचा कालावधी यथाप्रमाण ८.३३% सानुग्रह अनुदानआणि यथाप्रमाण जादा र.रु.२०,०००/- देय राहील. सहा महिन्यापेक्षा कमी सेवा झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना ८.३३% सानुग्रह अनुदान व जादा र.रु. २०,०००/- देय राहणार नाही. तथापि ज्या रजा राखीव वैद्यकिय अधिकारी आणि रजा राखीव नर्सेस यांच्या नेमणुका वेतनश्रेणीत करण्यात आलेल्या आहेत व त्यांना काही दिवस ब्रेक देऊन पुन्हा वेतनश्रेणीत नेमणुका

देण्यात आल्या आहेत अशांच्या बाबतीत खंडित सेवेचा कालावधी वगळता यथाप्रमाण ८.३३% सानुग्रह अनुदान व यथाप्रमाण जादा र.रु. २०,०००/- अनुज्ञेय राहील.

२) ८.३३% सानुग्रह अनुदानची रक्कम ही मार्च २०२१ च्या वित्तलब्धीवर अदा करण्यात येईल. त्यामध्ये वेतन मर्यादा राहणार नाही.

३) महापालिकेतील अधिकारी / कर्मचा-यांना दि.०२/०३/२०२१ ते दि.३१/०३/२०२१ या कालावधीत पदोन्नती किंवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेतंर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी लागु केली आहे.अशा कर्मचा-यांना ८.३३% सानुग्रह अनुदान अदा करण्याकामी त्यांचे मूळ पदावरील वेतन विचारात घ्यावे. पदोन्नतीच्या पदाचे वेतन किंवा वरिष्ठ वेतनश्रेणी मधील वेतन विचारात घेऊ नये.

४) वित्तलब्धी या संज्ञेत मूळवेतन, वैयक्तिक वेतन,महागाई भत्ता, प्रतिनियुक्तीवरील भत्ता, व्यवसायरोध भत्ता याचा समावेश असेल. तथापि घर भाडे भत्ता, पूरकभत्ता, वैद्यकीय भत्ता व इतर बाबीचा समावेश करण्यात येऊ नये.

५) बालवाडी शिक्षकांना खालील सुत्रानुसार जादा रक्कम देय राहील.

जादा र.रु. २०,०००/- ÷ ३६५ × हजर दिवस = द्यावयाची जादा रक्कम.

६) सन २०२०-२१ या वर्षामध्ये सहा महिन्यापासून संपूर्ण आर्थिक वर्षात ज्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी यात मानधनावरील अधिकारी / कर्मचारी, मानधनावरील वैद्यकीय अधिकारी आणि समूह संघटक, DAY NULM अधिकारी/कर्मचारी व तासिका तत्वावर नेमलेले कर्मचारी, महापालिका आस्थापनेवर करार पध्दतीने/ मानधनावर नेमलेल्या तसेच शासनाकडून पगारापोटी अनुदान मिळणा-या सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी काम केले आहे यांचा समावेश राहिल. त्यांना जादा र.रु.२०,०००/- यथाप्रमाण देय राहील. मात्र दोन नेमणुकीच्या दरम्यान काही खंडित कालावधी असेल तर तो वगळून यथाप्रमाण जादा र.रु. २०,०००/- देय राहील.

७) महानगरपालिका आस्थापनेवरील जे अधिकारी व कर्मचारी सेवानिलंबित आहेत, अशा अधिका-यांना/ कर्मचाऱ्यांना त्यांना देण्यात येणाऱ्या निर्वाह वेतनाच्या ८.३३% रक्कम यथाप्रमाणसानुग्रह अनुदान व जादा र.रु.२०,०००/- इतके यथाप्रमाण देय राहील. तसेच जे अधिकारी/ कर्मचारी सन २०२०-२१ मध्ये सेवानिलंबित झाले आहेत. अशांच्या बाबतीत त्यांची वेतनश्रेणीतील सेवा व सेवानिलंबन कालावधीतील निर्वाह वेतन विचारात घेऊन यथाप्रमाण ८.३३% सानुग्रह अनुदान व जादा र.रु.२०,०००/- देय राहील. तसेच गैरहजर/ विनावेतनी रजेवरील कर्मचाऱ्यांचे बाबतीत यथाप्रमाण ८.३३% सानुग्रह अनुदान व यथाप्रमाण जादा र.रु. २०,०००/- देय राहील.

८) जे अधिकारी / कर्मचारी सन २०२०-२१ या वर्षात महापालिका सेवेत होते. तथापि नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त,मयत किंवा स्वेच्छा व वैद्यकिय कारणास्तव सेवानिवृत्त झाले आहेत, राजीनामा दिलेले, सेवेतून कमी केलेले / सेवा समाप्त केलेले अधिकारी/कर्मचारी यांचा सेवाकाल विचारात घेऊन तसेच बदली झालेले प्रतिनियुक्तीवरील अधिकारी / कर्मचारी यांचा सहा महिन्यापेक्षा जास्त असलेला सेवाकाल विचारात घेऊन त्यांना यथाप्रमाण ८.३३% सानुग्रह अनुदान व यथाप्रमाण जादा र.रु.२०,०००/- देय राहील.

९) महापालिका अधिकारी व कर्मचा-यांना ज्या प्रमाणे ८.३३% सानुग्रह अनुदान व जादा र.रु.२०,०००/- मंजूर करण्यात आले आहे. त्याच दराने शिक्षण विभागातील(शिक्षण मंडळ) अधिकारी व कर्मचारी यांना ८.३३% सानुग्रह अनुदान व जादा र.रु.२०,०००/- मंजूर करण्याची कार्यवाही शिक्षण विभागाने(शिक्षण मंडळ)करावी.

१०) उपरोक्त निकषानुसार महापालिका व शिक्षण विभाग आस्थापनेवरील सर्व अधिकारी व कर्मचा-यांना सन २०२० - २१ करिता व पुढील ४ वर्षासाठी मान्यता प्राप्त संघटनेशी करारनामा करुन ८.३३% सानुग्रह अनुदान व जादा र.रु.२०,०००/- मंजूर करण्यासाठी मा.महापालिका सभेच्या उमेद मान्यतेवर मान्यता देण्यात येत आहे, तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका अस्थापनेवर सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात अधिसंख्य पदावर काम करीत असलेल्या तसेच नियमित वेतनश्रेणीतून अधिसंख्य पदावर नियुक्ती दिलेल्या कर्मचा-यांना यथाप्रमाणे ८.३३% सानुग्रह व जादा र.रु.२०,०००/- देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच मान्यतेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०४१८ विषय क्रमांक- ३७
दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- मध्यवर्ती साहित्य भांडार
सुचक- मा.फुगे भिमाबाई अनुमोदक- मा.सुजाता पालांडे
संदर्भ- मा.अति. आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मसाभां/२/कावि/९८९/२०२१ दि.३०/०९/२०२१.
मा.अति. आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियांनातर्गत येणा-या मोहिमांकरीता फ्लेक्स छपाई करुन घेणेकामी ई-निविदा क्रं.२/२०२१-२२ प्रसिद्ध करणेत आली होती. यामध्ये मे.वाव्हाळकर एंटरप्रायजेस, वेणुनगर रोड, वाकड यांचे फ्लेक्स तयार करुन लावणेकामी लघुत्तम दर र.रु.८.९९ प्रति. चौ.फुट प्राप्त झाले आहे. एकूण ८०,००० चौ.फुट छपाई करणेकामी र.रु.७,१९,२००/- व आनंद एन्टंरप्राईजेस ,चिंचवड याचे (५*३) फ्लेक्स छपाई करुन घेणेकामी लघुत्तम दर र.रु.८.१५ प्रति. चौ.फुट प्राप्त झाले आहे. एकुण ४०,००० (५*३) चै. फुट तयार करुन घेणेकरिता र.रु.३,२६,०००/- इतका खर्च येणार आहे. दोन्हीच्या र.रु.१०,४५,२००/- (अक्षरी र.रु.दहा लाख पंचेचाळीस हजार दोनशे फक्त) खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०४१९ विषय क्रमांक- ३८
दिनांक- ०६/१०/२०२१ विभाग- मध्यवर्ती साहित्य भांडार
सुचक- मा.सुजाता पालांडे अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/९६७/२०२१ दि.३०/०९/२०२१.
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

वैद्यकीय विभाग कोविड-१९ कामकाजाकरीता शासनाकडील नोंदणीकृत संस्थेमार्फत मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणेबाबत मे.ब्रिस्क इंडीया प्रा लि. यांना आदेश क्र.मसाभां/५/कावि/३६३/२०२१ दि.०९/०४/२०२१ कार्यारंभ आदेश देणेत आला असून ठराव क्र. ९१९३ दि.१५/०४/२०२१ अन्वये तसेच मे. ब्रिक्स इंडीया यांना २ महिने कालावधी दिनांक ९/०६/२१ ते ८/८/२१ करीता मुदतवाढ मा. स्थायी समिती ठराव क्र.१०१८० दिनांक १/०९/२०२१ अन्वये मान्यता दिलेली आहे. मे. ब्रिस्क इंडीया प्रा. लि. यांचा २ महिन्याचा मुदत वाढ कालावधी माहे ऑगस्ट दि.०८/०८/२०२१ रोजी संपुष्टात आला असून आणखीन १ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देणे बाबत दिनांक ०३/०९/२१ रोजीच्या मा.आयुक्त

कक्षात झालेल्या सभेच्या सभावृत्तांतानुसार मा. आयुक्त सो व मा. सहा. आरोग्य अधिकारी यांचे कडून सुचना प्राप्त झाल्यानुसार सदरचे लसीकरणाचे काम तातडीने करणे आवश्यक असलेने यापुर्वीचे अटी शर्ती कायम राहून तसेच कामगार कल्याण अधिकारी यांनी निश्चित केलेले किमान वेतन दरानुसार मे. ब्रिस्क इंडीया प्रा. लि. यांना ५० कोविड लसीकरण केंद्राकरीता की ५० स्टाफनर्स, २५ डेटाएन्ट्री ऑपरेटर, २५ वॉर्डबॉय/वार्डआया असे एकूण १०० कुशल / अकुशल मनुष्यबळाची मे ब्रिक्स इंडीया प्रा.लि यांनी दिनांक ९/०८/२०२१पासून ते ८/०९/२१ पर्यंत १ महिना कामकाज केले असल्याने १ महिने कालावधीकरीता मुदतवाढतसेच मा. सहा. आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेल्या तोंडी सूचनेनुसार व मे.ब्रिक्स इंडिया प्रा. लि मी यांचे दिनांक २२/०९/२०२१ चे पत्रानुसार१३ वॉर्डबॉय थेरगाव हॉस्पीटल येथे व १२ वॉर्डबॉय आकुर्डी हॉस्पीटल येथे कार्यरत आहेत, असे एकुण २५ वॉर्डबॉय यांची आवश्यकता असल्याने दिनांक ०९/०९/२१ पासुन ते ३०/०९/२१ पर्यंत २२ दिवस कालावधीकरीता आवश्यक मनुष्यबळ यांचे वाढीव कालावधीचे वेतनासाठी येणा-या खर्चास मा.स्थायी समिती सभा यांची मंजूरी घेणे आवश्यक आहे. त्यानुसार भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ६३ (६) व कलम ६७ (६) (क) यास अधिन राहून कोरोना विषाणूचा (COVID -19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आपत्तकालीन परिस्थिती व कोरोनाच्या अटकावासाठी साथरोगाची आपत्तीजनक स्थितीचा सामना करणेसाठी मे. ब्रिस्क इंडीया प्रा लियांचेकडून ५० कोविड लसीकरण केंद्राकरीता ५० स्टाफनर्स, २५ डेटाएन्ट्री ऑपरेटर, २५ वॉर्डबॉय/वार्डआया असे एकूण १०० कुशल / अकुशल मनुष्यबळाची दि.०९/०८/२०२१ पासून ते दि.०८/०९/२१ पर्यंत १ महिन्यासाठी रक्कम रु.२८,६९,८७२/- व वॉर्डबॉय दि.०९/०९/२१ पासुन ते दि. ३०/०९/२१ पर्यंत २२ दिवसासाठी र.रु.४,७९,६७५/- असे एकुण ५२ दिवसाचे कालावधी करीता मुदतवाढ देणेस व करारनामा करुन नेमणूक करणेकामी येणा-या एकूण र.रु.३३,४९,५४७/- चे खर्चास मान्यता, यापुर्वीचे आदेशातील अटी शर्ती तसेच कामगार कल्याण अधिकारी यांनी निश्चित केलेले किमान वेतन दरास आधीन राहून मान्यता देण्यात येत आहे, तसेच वायसीएमएच येथे स्वतंत्र पोलिस चौकी उभारणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०४२० | विषय क्रमांक- ३९

दिनांक- ०६/१०/२०२१ | विभाग- स्थापत्य अ क्षेत्रिय

सुचक- मा.फुगे भिमाबाई | अनुमोदक- मा.सुजाता पालांडे

संदर्भ- मा.अति आयुक्त(१) यांचे पत्र क्र.अक्षे/स्था/कावि/१८०/२०२१ दि.३०/०९/२०२१.

मा.अति आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे.

पिंपरी चिंचवड मनपा मुख्यालयाचे तिसऱ्या मजल्यावर विस्तारीकरण करणे. या कामासाठी वास्तुविशारद (Architect)/ प्रकल्पसल्लागार (PMC) नेमणूक करणेची आवश्यकता आहे. सदर विस्तारीकरणाच्या इमारतीचे नकाशे बनविणे, प्लॅनिंग व डिझाईन तयार करणे, अंदाजपत्रक तयार करणे, स्ट्रक्चरल डिझाईन तपासणे, निविदा प्रसिद्ध करणे तसेच निविदापुर्व व निविदा पश्चात ही सर्व कामे करणेसाठी वास्तुविशारद यांची नेमणूक करणे अत्यावश्यक आहे. सदर बाबत संदर्भ क्र.१अन्वये मनपाच्या अधिकृत वेबसाईटवर /सल्लागार यांच्याकडून दरपत्रक मागविण्यासाठी दि.१३/०९/२०२१ रोजी कोटेशन नोटीस प्रसिद्ध करणेत आली होती. या विभागाकडून पाठविलेल्या इमेलची प्रिंट व

त्यावेळी संगणक विभागाने प्रसिद्ध केलेल्या दरपत्रकाचे पृष्ठाची प्रिंट, सोबत जोडलेल्या आहेत. सीलबंद लिफाफ्यात दरपत्रक सादर करण्याची अंतिम मुदत दि.२१/०९/२०२१ रोजी दु.३:०० वाजेपर्यंत होती. या कालावधीत ०३ सीलबंद कोटेशन प्राप्त झाली आहेत. सादर कोटेशन दि.२२/०९/२०२१ सकाळी ११:०० वाजता उघडण्यात आले असून त्याचा तुलनात्मक तक्ता सोबत सादर करण्यात आला आहे. सदर तक्यानुसार मे.नियोजन कंन्सल्टंट यांनी लघुत्तमदर १.९५% (Architect) व १.४५% PMC (जीएसटी सोडून) सादर केल्याचे दिसून येते, तरी मे.नियोजन कंन्सल्टंट यांनी लघुत्तम दर सादर केल्याने त्यांची सदर कामाच्या निविदापूर्व व निविदापश्चात आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करणेस हरकत वाटत नाही. सबब, पिंपरी चिंचवड मनपा मुख्यालयाचे तिस-या मजल्यावर विस्तारीकरण करणे. या कामासाठी वास्तुविशारद (Architect)/ प्रकल्पसल्लागार (PMC) नेमणूक करणे. या कामासाठी मे.नियोजन कंन्सल्टंट यांची वास्तुविशारदसाठी १.९५% दर व प्रकल्प सल्लागार साठी १.४५% दरानुसार निविदा पूर्व व निविदा पश्चात कामांसाठी नेमणूक करणे बाबत व त्याकामी येणारी फी **(**जीएसटी सोडून**)** अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०४२१ | विषय क्रमांक- ४०

दिनांक- ०६/१०/२०२१ | विभाग- फ क्षेत्रिय

सुचक- मा.भोईर सुरेश | अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.फक्षेका/२/आ/कावि/३८२/२०२१ दि.३०/०९/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

मनपाचे फ क्षेत्रीय कार्यालयाकडील आरोग्य विभागाकडील धुरीकरण इंधन खर्च या लेखाशिर्षावर सन २०२१-२०२२ करीता तरतुद र.रु.११,००,०००/- करणेत आली होती. दिनांक ३१/०८/२०२१ अखेर र.रु ९,२९,०३१/- पर्यंत खर्च झालेला असून शिल्लक र. रु १,७०,९६९/- इतकी आहे. धुरीकरण इंधन खर्च या लेखाशिर्षावरील दरमहा अंदाजे २,००,०००/- प्रमाणे खर्च असल्याने सद्यस्थितीत एकूण ३ माहिन्यांचे बिल अदा केले आहे. व उर्वरीत ९ महिन्यांकरीता ( जुलै २०२१ ते मार्च २०२२) या कालावधीकरीता एकूण र.रु.१७,००,०००/- इतकी तरतूद आवश्यक आहे. सध्या इंधन दरात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने धुरीकरणासाठी लागणा-या इंधनावरील खर्चात अंदाजे र.रु.१७,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. वर्गीकरणाचा तपशिल खालीलप्रमाणे -

| **अ.क्रं.** | **लेखाशिर्ष** | **सन २०२१-२२ ची तरतूद** | **घट र.रु.** | **वाढ र.रु.** |
|---|---|---|---|---|
| १ | खाजगीकरणांद्वारे साफसफाई | ८,८०,००,०००/- | १७,००,०००/- | ०० |
| २ | धुरीकरण इंधन खर्च | ११,००,०००/- | ०० | १७,००,०००/- |

सबब, 'फ' क्षेत्रीय आरोग्य कार्यालयाकडील सन २०२०-२१ मध्ये"खाजगीकरणाद्वारे साफसफाई" या लेखाशिर्षावर केलेल्या तरतुदीमधून "धुरीकरण इंधन खर्च" या लेखाशिर्षावर र.रु.१७,००,०००/-(अक्षरी र.रु.सतरा लाख फक्त) तरतूद वर्ग करणेस मान्यता घेणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ अनुसूची ड मधील प्रकरण ७ तरतुद क्रं. २ (१) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

**सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेण्यात आले.**

ठराव क्रमांक- १०४२२ विषय क्रमांक- ४१

दिनांक- ०६/१०/२०२१

सुचक- मा.भोईर सुरेश अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.भोईर सुरेश व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

महापालिकेत १९९७ पासुन घंटागाडी कामगार आरोग्य विभागात कार्यरत आहे. कोविड१९ च्या महामारीत जोखीम पत्करुन सदरचे कामगार काम करीत आहे. मागील वर्षी दिवाळी सणासाठी घंडागाडी ठेकेदारांना र.रु.३०,०००/- विशेष बाब म्हणून बक्षिस देणेत आलेले आहे. घंटागाडी ठेकेदार कामगारांना र.रु.४०,०००/- दिवाळी सणासाठी बक्षिस देण्यास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०४२३ विषय क्रमांक- ४२

दिनांक- ०६/१०/२०२१

सुचक- मा.कदम शशिकांत अनुमोदक- मा.कांबळे अंबरनाथ.

संदर्भ- मा.कदम शशिकांत व मा.कांबळे अंबरनाथ यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड शहरातील औधोगिक शहर म्हणून संपूर्ण देशात ओळख आहे. या शहरामधील भोसरी, चिंचवड व पिंपरी या ठिकाणी एमआयडीसीमध्ये विविध औधोगिक कंपन्या कार्यरत असल्यामुळे काही अंशी प्रदुषण पातळीमध्ये वाढ होते. शहराची प्रदुषण पातळी कमी राहणे अत्यंत आवश्यक असून यासाठी नव-नवीन उपाययोजना राबविणे गरजेचे आहे. पिंपरी चिंचवड शहरामध्ये पिंपरी, भोसरी, निगडी, चिंचवड इत्यादी ठिकाणी गावठाण भाग असून गावठाणातील रस्ते अरुंद आहेत. गावठाण भाग सोडून उपनगरामध्ये मोठ्याप्रमाणावर रस्त्यांची रुंदी वाढलेली आहे. या रुंद रस्त्यावर वाहतूक सुरळीतपणे सुरु राहते, परंतू गावठाण भागातील अरुंद रस्त्यावर नेहमीच गर्दी होते. या अरुंद रस्त्यावर पीएमपीच्या मोठ्या १२ मिटर बसेसचे संचलन करू शकत नाही. त्यामुळे गावठाण भागातील नागरिकांना बस सेवेपासून वंचित राहावे लागते. पर्यायाने अन्य वाहनांचा वापर करावा लागतो. ही बाब विचारात घेता गावठाण भागातील प्रवाशांच्या सेवेसाठी पीएमपीएमएलच्या बसेसचे संचलन सुरु करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड शहराचा स्मार्ट सिटीमध्ये समावेश करण्यात आलेला आहे. स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत नवीन योजना सुरु करण्यात आलेल्या आहे. शहराची वाढलेली लोकसंख्या औधोगिकीकरण, स्मार्ट सिटी योजनेमधील नवीन विकासकामे व त्याअनुषंगाने वाढलेले मानांकन, प्रदुषण पातळी कमी करून नागरिकांना शुद्ध व स्वच्छ अल्हाददायक वातावरण राहावे या हेतूने शहरात इलेक्ट्रिक बसेस असणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच पिंपरी, भोसरी, निगडी, चिंचवड इत्यादी ठिकाणी गावठाण भाग असल्याने या भागातील नागरिकांना बस सेवा देणे आवश्यक असल्याने महानगरपालिकेमार्फत ७ व ९ मिटर इलेक्ट्रिक बसेस खरेदीसाठी निविदा प्रक्रीया राबविणेस व बसेस खरेदी पश्चात पीएमपीएमएलला संचलनास देणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०४२४ विषय क्रमांक- ४३

दिनांक- ०६/१०/२०२१

सुचक- मा.भोईर सुरेश अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.भोईर सुरेश व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

श्री.मिलिंद नारायण सोमण, रा.आम्रपाली हौसिंग सोसायटी, अंकुश चौक निगडी पुणे ४१२०४४ यांची अंध बुद्धीबळ ऑलिंम्पियाड स्पर्धा, ग्रीस या स्पर्धेकरीता निवड झाली असून सदर स्पर्धा रोड्स, ग्रीस येथे दि.१६ दे २७ ऑक्टोंबर २०२१ या काळात होणार आहेत. सदर स्पर्धेकरीता श्री.मिलिंद नारायण सोमण यांना व्हिसा र.रु.१२,५००/- व दोन महिने बुद्धीबळ प्रशिक्षण खर्च र.रु.६०,०००/- असे एकूण र.रु.७२,५००/- इतक्या आर्थिक सहाय्याची आवश्यकता आहे. सबब श्री.मिलिंद नारायण सोमण रा.आम्रपाली हौसिंग सोसायटी, अंकुश चौक निगडी पुणे ४१२०४४ यांची अंध बुद्धीबळ ऑलिंम्पियाड स्पर्धा, ग्रीस येथे निवड झाल्याने त्यास स्पर्धेसाठी जाण्यास व्हिसा र.रु.१२,५००/- व दोन महिने बुद्धीबळ प्रशिक्षण खर्च र.रु.६०,०००/- असे एकूण र.रु.७२,५००/- इतके अथवा नियमानुसार आर्थिक सहाय्य मंजूर करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०४२५ विषय क्रमांक- ४४

दिनांक- ०६/१०/२०२१

सुचक- मा.बनसोडे राजू अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.बनसोडे राजू व मा.भोईर सुरेश यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र. ३० दापोडी नदीलगत अर्धवट गॅबिनवॉलचे काम झाले आहे. त्यामुळे पुरपर्जन्य स्थितीत नागरिकांच्या घरात पुराचे पाणी शिरते. त्यांच्या मालमत्तेचे मठ्या प्रमाणावर नुकसान होते. पूरपरिस्थित त्यांना महापालिकेच्या शाळा व सांस्कृतिक भवन येथे स्थलांतरित करावे लागते. तरी नदीलगतच्या त्या अर्धवट गॅबिनबॉलचे काम पूर्ण झाल्यास असंख्य नागरिकांच्या घरात पाणी शिरनार नाही. तरी गॅबिनवॉल बांधण्यास मान्यता देणेत येत आहे.

दर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०४२६ विषय क्रमांक- ४५

दिनांक- ०६/१०/२०२१

सुचक- मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.कांबळे अंबरनाथ व मा.भोईर सुरेश यांचा प्रस्ताव.

मनपाच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या निर्मितीसाठी कै.अण्णासाहेब मगर यांनी केलेल्या कामाची कर्मयोगी कै.अण्णासाहेब मगर काळ व्यक्तीत्व कर्तुत्व लेखिका डॉ.सौ. सीमा सागर काळभोर यांच्या पुस्तकाची माहिती सर्वांना व्हावी याकरिता महानगरपालिकेचे पदाधिकारी/ अधिकारी व कर्मचारी यांना वाचनास देणेस मान्यता देणेत येत आहे. जेणे करून महानगरपालिकेच्या निर्मिती बाबतचा इतिहास सर्वांनसमोर येईल.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०४२७ विषय क्रमांक- ४६

दिनांक- ०६/१०/२०२१

सुचक- मा.सुजाता पालांडे अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.सुजाता पालांडे व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.२० मधील संत तुकाराम व्यायाम शाळा ही हनुमान स्पोर्ट्स अँकडमी हनुमान जिम दि.१०/१०/२०१७ पासून योग्य पद्धतीने चालवत आहे. त्यांची मुदत संपूष्टात येत आहे तरी त्यांना मुदत संपले पासून पुढील ११ महिने करिता सेवा शुल्क तत्वावर करार करून मुदत वाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०४२८ विषय क्रमांक- ४७

दिनांक- ०६/१०/२०२१

सुचक- मा.कदम शशिकांत अनुमोदक- मा.कांबळे अंबरनाथ.

संदर्भ- मा.कदम शशिकांत व मा.कांबळे अंबरनाथ यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने बी.आर.टी. विभागामार्फत प्रभाग क्र. २५ व २६ येथे अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार ४५ मीटर डी.पी. रस्ता विकसित करण्यात येणार आहे. नुकतीच त्याची निविदा देखील प्रसिध्द झाली. त्यामध्ये सदरिल कामाचे शीर्षक हे “प्रभाग क्र.२५ मधील दत्तमंदिर, वाकड डी.पी.रस्ता अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार विकसित करणे” असे आहे. परंतू सदरिल रस्ता हा प्रभाग क्र. २५ व २६ मध्ये समांतर आहे. त्यामुळे सदरिल कामाचे शार्षक तात्काळ बदलून ते “प्रभाग क्र.२५ व २६ मधील दत्तमंदिर, वाकड डी.पी.रस्ता अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार विकसित करणे” असे करणेस व सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात वरिलप्रमाणे नावात दुरूस्ती करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०४२९ विषय क्रमांक- ४८

दिनांक- ०६/१०/२०२१

सुचक- मा.भोईर सुरेश अनुमोदक- मा.कदम शशिकांत

संदर्भ- मा.भोईर सुरेश व मा.कदम शशिकांत यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.१३ साईनाथनगर व प्रभागातील विविध ठिकाणी स्ट्रॉम वॉटर लाईन टाकणे व प्रभाग क्र.१३ निगडी गावठाण व प्रभागातील विविध ठिकाणी स्ट्रॉम वॉटर लाईन टाकणे या कामास भांडवली कामे लेखाशिर्षाखाली सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात २,६५,०००/- इतकी तरतुद ठेवण्यात आली होती. ठेकेदाराने आत्तापर्यंत १००% काम पुर्ण केले असून ठेकेदारास उर्वरित काम करुन बिल अदायगी

करण्यासाठी र.रु.८,५५,०००/- इतकी तरतुद अपुरी पडत असल्यामुळे या विभागांतर्गत प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कामामधुन र.रु.८,५५,०००/- इतकी रक्कम वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे. (वाढ/ घट र.रु. ८,५५,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०४३० विषय क्रमांक- ४९

दिनांक- ०६/१०/२०२१

सुचक- मा.भोईर सुरेश अनुमोदक- मा.कदम शशिकांत

संदर्भ- मा.भोईर सुरेश व मा.कदम शशिकांत यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र १३ मधील निगडी गावठाण येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामास भांडवली कामे लेखाशिर्षाखाली सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात ०/- इतकी तरतुद ठेवण्यात आली होती. ठेकेदाराने आत्तापर्यंत १००% काम पुर्ण केले असून ठेकेदारास उर्वरीत काम करून बिल अदायगी करण्यासाठी र.रु.३,००,०००/- इतकी तरतुद अपुरी पडत असल्यामुळे या विभागाअंतर्गत प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कामामधुन र.रु.३,००,०००/- इतकी रक्कम वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे. (वाढ/ घट र.रु.३,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०४३१ विषय क्रमांक- ५०

दिनांक- ०६/१०/२०२१

सुचक- मा.भोईर सुरेश अनुमोदक- मा.कदम शशिकांत

संदर्भ- मा.भोईर सुरेश व मा.कदम शशिकांत यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र १३ यमुनानगर व प्रभागातील विविध ठिकाणी रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामास भांडवली कामे लेखाशिर्षाखाली सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात र.रु.१०,००,०००/- इतकी तरतुद ठेवण्यात आली होती. ठेकेदाराने आत्तापर्यंत १००% काम पुर्ण केले असून ठेकेदारास उर्वरीत काम करून बिल अदायगी करण्यासाठी र.रु.८,००,०००/- इतकी तरतुद अपुरी पडत असल्यामुळे या विभागाअंतर्गत प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कामामधुन र.रु.८,००,०००/- इतकी रक्कम वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे. (वाढ/ घट र.रु.८,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०४३२ विषय क्रमांक- ५१

दिनांक- ०६/१०/२०२१

सुचक- मा.भोईर सुरेश अनुमोदक- मा.कदम शशिकांत

संदर्भ- मा.भोईर सुरेश व मा.कदम शशिकांत यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र १३ मधील विविध मनपा इमारतींची आवश्यकतेनुसार स्थापत्य विषक कामे करणे या कामास भांडवली कामे लेखाशिर्षाखाली सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात र.रु.१९,००,०००/- इतकी तरतुद ठेवण्यात आली होती. ठेकेदाराने आत्तापर्यंत १००% काम पुर्ण केले असून ठेकेदारास उर्वरीत काम

करून  बिल अदायगी करण्यासाठी र.रु.५,००,०००/- इतकी तरतुद अपुरी पडत असल्यामुळे या विभागाअंतर्गत प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कामामधुन र.रु.५,००,०००/- इतकी रक्कम वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे. (वाढ/ घट र.रु. ५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०४३३ विषय क्रमांक- ५२

दिनांक- ०६/१०/२०२१

सुचक- मा.भोईर सुरेश अनुमोदक- मा.कदम शशिकांत

संदर्भ- मा.भोईर सुरेश व मा.कदम शशिकांत यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र १३ मधील विविध मनपा इमारतींची आवश्यकतेनुसार स्थापत्य विषक कामे करणे या कामास भांडवली कामे लेखाशिर्षाखाली सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात र.रु.१९,००,०००/- इतकी तरतुद ठेवण्यात आली होती. ठेकेदाराने आत्तापर्यंत १००% काम पुर्ण केले असून ठेकेदारास उर्वरीत काम करून  बिल अदायगी करण्यासाठी र.रु.५,००,०००/- इतकी तरतुद अपुरी पडत असल्यामुळे या विभागाअंतर्गत प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कामामधुन र.रु.५,००,०००/- इतकी रक्कम वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे. (वाढ/ घट र.रु.५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०४३४ विषय क्रमांक- ५३

दिनांक- ०६/१०/२०२१

सुचक- मा.पौर्णिमा सोनवणे अनुमोदक- मा.बनसोडे राजू

संदर्भ- मा.पौर्णिमा सोनवणे व मा.बनसोडे राजू यांचा प्रस्ताव.

फ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्र.क्र.१२ रुपीनगर मेन रोड येथील रस्ता रुंदीकरण कामास अडथळा ठरणारे उपस्कर वाहिन्या व पोल हलविणे या कामाचा समावेश विद्युत विभागाचे सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकामध्ये करणेत आलेला आहे. परंतु कोरोना महामारीमुळे भांडवली खर्चावर मर्यादा असल्याने या कामाकरीता पुरेशी तरतुद उपलब्ध होऊ शकलेली नाही. सद्य स्थितीत सदर खांब, हिडर पिलर, उच्चदाब व लघुदाब उपस्कर वाहिन्या इ. यांचा अडथळा होत असून अपघाताचा धोका संभवतो. अपु-या तरतुदीमुळे सदर कामाकरीता निविदा प्रसिद्ध करणे शक्य होत नाही तसेच निविदा कार्यवाही करावयाची झाल्यास तरतुद वर्गीकरण झालेनंतरच निविदा काढता येईल, तरी सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात प्रस्तावात नमुद केलेल्या नविन विकास कामांच्या तरतुदीमध्ये वाढ/ घट करण्यास मान्यता देण्यात येत आहे. (वाढ/ घट र.रु.२५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०४३५ विषय क्रमांक- ५४

दिनांक- ०६/१०/२०२१

सुचक- मा.भोईर सुरेश अनुमोदक- मा.कदम शशिकांत

संदर्भ- मा.भोईर सुरेश व मा.कदम शशिकांत यांचा प्रस्ताव.

झोनिपु स्थापत्य विभागाकडील प्रभाग क्र १३ मधील काही विकासकामे सद्यस्थितीत पुर्ण करणेत आलेली असून सदर कामांचे बिल अदायगीकामी तरतुद उपलब्ध नाही तरी प्रस्तावात नमुद कामांच्या तरतुद वर्गीकरणास मान्यता देण्यात येत आहे.

(वाढ/ घट र.रु.३९,८०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- १०४३६ विषय क्रमांक- ५५

दिनांक- ०६/१०/२०२१

सुचक- मा.भोईर सुरेश अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

संदर्भ- मा.भोईर सुरेश व मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव.

ग प्रभागातील मनपाच्या सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात नागरिकांच्या मागणी व विकासाच्या दृष्टीने इतर विशेष योजना- लेखाशिर्षातील कामांच्या तरतुदी अंत्यत कमी असल्याने पुढील काम करणे शक्य होत नाही त्यामुळे प्रस्तावात नमुद केलेल्या तक्त्यामधील सन २०२१-२२ च्या कामांची खर्च न होणारी तरतूद प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे वाढवुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(वाढ/ घट र.रु.२,००,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

------------

(अॅड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे)
सभापती, स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११०१८.



(उल्हास बबनराव जगताप)
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८, नगरसचिव विभाग
क्रमांक - नस/३/कावि/१६४८/२०२१
दिनांक - ११/१०/२०२१

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.

(क्र.स्था/नि/उद्यान/३७०/२०२१ दि.२७/०९/२०२१ विषय क्र.१३ चे लगत)

(13)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८ स्थापत्य उद्यान
क्र.स्था/नि/उद्यान/३७० /२०२१
दि. २७/९ /२०२१

प्रपत्र ड (१ ते ५)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | रॉयल्टी व मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून निविदा रक्कम | रॉयल्टी ची रक्कम | मटेरियल टेस्टिंग चार्जेस | स्विकृत दर | | निविदा रकमेची पन्नासेवी रक्कम स्वीकारण्यात येणार (+ त्यावरील वस्तू व सेवा कर प्रचलित दराने अदा करणार) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | | १३ |
| १ | मे.वेदीका कन्स्ट्रक्शन | ४२/१६/२०२०-२०२१ | प्रभाग क्र.५ मधील कै.राधुबाई नामाजी गवळी उद्यान व इतर उद्यानांमध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | २९/०६/२०२१ | स्था/नि/उद्यान/३५९/२०२१ | ३०/०६/२०२१ | २१,९९,६७२ | २१,८३,१२१ | ४४,८८१ | १६,५५० | १८.०९ | %कमी | १८,४९,५२५ |

कार्यकारी अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८

(क्र.नस/१/काचि/११४५/२०२१ दि.०६/१०/२०२१ विषय क्र.२९ चे लगत)

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी-१८.**

**नगरसचिव कार्यालय**

प्रपत्र अ (क्रमांक नस/१/कावि/११४५/२०२१ दि.२९/९/२०२१ चे लगत)

रजा प्रवासभत्ता सवलतीसह अर्जित रजा/अर्जित रजा/पूर्णवेतनी परावर्तीत रजा मंजुरीबाबत.

| अ. क्र. | कर्मचा-याचे नाव व पदनाम | रजेचा प्रकार | रजा कालावधी | रजेच्या मागे, पुढे सुट्या | रजेचे कारण | दि.३१/१२/२०२१ अखेर शिल्लक रजा अर्जित /पुर्णवेतनी परावर्तीत रजा | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.खामकर अनिल लक्ष्मण- मुख्य लिपिक | अर्जित रजा | दि.१४/०९/२०२१ (१दिवस)<br>दि.१६/९/२०२१ (१दिवस)<br>दि.२४ /९/२०२१ (१दिवस) | २५/०९/२०२१ ते २६/०९/२०२१ | खाजगी | २५७ | |
| २ | श्री.मरळ सुधीर शिवाजी- मुख्य लिपीक | अर्जित रजा | दि.२३/०९/२०२१ ते [illegible]/२०२१. ([illegible] दिवस) | - | घरगुती | ३००+११ | |
| ३ | श्री. स्वप्निल अशोक पांचाळ- उपलेखापाल | अर्जित रजा | दि.६ /०९/२०२१ (१दिवस) | ०४/०९/२०२१ ते ०५/०९/२०२१ | वैद्यकीय कारणास्त्व रजा मागणी | १६६ | |
| ४ | श्रीमती.टिपणीस रेवती राजेश-लघुलेखक | अर्जित रजा | दि.१३/०९/२०२१ ते दि.१४/०९/२०२१ (२ दिवस) | १०/०९/२०२१ते १२/०९/२०२१ | गौरी पूजन | १६० | |
| ५ | श्री. निलेश सुरेश आढाव- लिपिक | अर्जित रजा | दि.२०/९/२०२१ ते दि.२१/९/२०२१ (२दि.) | - | आजारी असल्यामुळे | ११८ | |

(क्र.नस/१/कावि/११४५/२०२१ दि.०६/१०/२०२१ विषय क्र.२९ चे लगत)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | श्री.निवृत्ती सदाशिव उभे-वाहन चालक | अर्जित रजा | दि.२०/०९/२०२१ ते दि. २१/०९/२०२१ (२दिवस) | १८/०९/२०२१ ते १९/०९/२०२१ | बाहेरगावी जाणेकामी | २५३ | | |
| ७ | श्री.प्रशांत सुभाष गायकवाड-शिपाई | अर्जित रजा | दि.१७/०९/२०२१ (१ दिवस) | १८/०९/२०२१ ते १९/०९/२०२१ | घरगुती | ८६ | | |
| ८ | श्रीमती.ढोक छाया विलास-शिपाई | वैद्यकिय रजा | दि.१३/०९/२०२१ ते दि.१५/०९/२०२१ (३ दिवस) | ११/०९/२०२१ ते १२/०९/२०२१ | तब्येत ठीक नसल्यामुळे | ७१ | | |
| ९ | श्री.निलेश दिंगबर आरभाईकर शिपाई | अर्जित रजा | दि.२१/९/२०२१(दि.१दिवस) | - | घरगुती कारणास्तव | ३००+११ | | |

(उल्हास बबनराव जगताप)
नगरसचिव विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे-१८

(क्र.अक्षेका/लेखा/७/कावि/१९४/२०२१ दि.०६/१०/२०२१ विषय क्र.३५ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी-44

विषयपत्र क्र.अक्षेका/नि-7/कावि/१९४ /2021 दि.०६/१०/2021 लगत

प्रपत्र " अ " - विद्युत विभाग

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा दिनांक | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेश दिनांक | निविदा रक्कम | निविदा स्विकृत दर | | निविदा खर्चाची मान्यतेनी रक्कम कार्यादेशाप्रमाणे (+ त्यावरील वस्तु व सेवा कर प्रचलित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 12 | | 13 |
| 1 | मे.त्रिमुर्ती मंडप स्पीकर्स ॲण्ड इलेक्ट्रीकल | 1/17/2020-21 | अ क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र. १५ मधील गे.क्र. २२,२४,२५,२६,२७-अ व २८ येथील विविध कार्यक्रमाकरिता तात्पुरती ध्वनिक्षेपण, प्रकाश व्यवस्था, जनित्रसंच, सी.सी.टीव्ही व अन्य विद्युत विषयक कामे करणे. (सन २०-२१) | 08-03-2021 | अक्षेकानि-7/कावि/113/2021 | 26-03-2021 | 847429 | 1.5 | %कमी | 834718 |
| 2 | मे.मोरया मंडप डेकोरेटर्स | 1/16/2020-21 | अ क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत प्रभाग क्र.१५ मधील गणेश तलाव व अन्य कार्यक्रमाकरिता तात्पुरती ध्वनिक्षेपण, प्रकाश व्यवस्था जनित्रसंच,सी.सी.टी.व्ही. व अन्य विद्युत विषयक कामे करणे.(सन २०-२१) | 8/3/20021 | अक्षेकानि-7/कावि/114/2021 | 26-03-2021 | 847351 | 3.20 | %कमी | 820236 |
| 3 | मे.मोरया मंडप डेकोरेटर्स | 1/15/2020-21 | अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र. १० मधील विविध कार्यक्रमाकरिता तात्पुरती ध्वनिक्षेपण प्रकाश व्यवस्था जनित्रसंच सी.सी.टी.व्ही. व अन्य विद्युत विषयक कामे करणे. (सन २०-२१) | 08-03-2021 | अक्षेकानि-7/कावि/115/2021 | 26-03-2021 | 845248 | 3.20 | %कमी | 818200 |
| 4 | मे.त्रिमुर्ती मंडप स्पीकर्स ॲण्ड इलेक्ट्रीकल | 1/20/2020-21 | अ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र. १९ मध्ये होणाऱ्या विविध कार्यक्रमाकरिता तात्पुरती स्वरूपात ध्वनीक्षेपण व प्रकाश व्यवस्था करणे (सन २०-२१) | 08-03-2021 | अक्षेकानि-7/कावि/112/2021 | 26-03-2021 | 581298 | 1.5 | %कमी | 572579 |
| 5 | मे.एमीई कम्युनिकेशन | 1/4/2020-21 | अ क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील EPABX यंत्रणेचे देखभाल दुरूस्ती व नुतनीकरणाची कामे करणे (२०२०-२१) | 08-03-2021 | अक्षेकानि-7/कावि/142/2021 | 11-05-2021 | 891125 | 6.80 | %कमी | 830529 |
| 6 | मे.जी एम.इलेक्ट्रीकल | 1/13/2020-21 | अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत म. फुले जयंती व डॉ. आंबेडकर जयंती व अन्य कार्यक्रमासाठी तात्पुरत्या स्वरूपातील विद्युत विषयक कामे करणे. (सन २०-२१) | 25-05-2021 | अक्षेकानि-7/कावि/96/2021 | 28-05-2021 | 673900 | 3.25 | %कमी | 651998 |

(क्र.अक्षेका/लेखा/७/कावि/१९४/२०२१ दि.०६/१०/२०२१ विषय क्र.३५ चे लगत)

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा दिनांक | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेश दिनांक | निविदा रक्कम | निविदा स्विकृत दर | | निविदा धारकांनी मान्यतेची रक्कम खालीलप्रमाणे (+ त्यावरील वस्तु व सेवा कर वगळून) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | मे.डी.एस.इलेक्ट्रीकल | 1/14/2020-21 | अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत म. फुले जयंती व डॉ. आंबेडकर जयंती व अन्य कार्यक्रमासाठी तात्पुरती वानिवंत्रण, विद्युत रोषणाई व अन्य विद्युत विषयक कामे करणे. (सन २०-२१) | 25-05-2021 | अक्षेका/नि-7/कावि/964/2021 | 28/5/2021- | 596130 | 3.25 | %कमी | 576756 |
| 8 | मे.आर्या इंजिनिअरींग | 1/22/2020 21 | अ क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील प्र. क्र. १९ मधिल जनरेटर व UPS इन्व्हर्टर यंत्रणेचे देखभाल दुरुस्ती करणे.(सन २०२०-२१) | 25-05-2021 | अक्षेका/नि-7/कावि/134/2021 | 7/06/2021 | 842626 | 12.50 | %कमी | 737298 |

क्षेत्रीय अधिकारी
अ क्षेत्रीय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी - ४४